नुतनवर्षाच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

• पुणे • अहिल्यानगर • छत्रपती संभाजीनगर • जालना • धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

नवीन वर्षाची पहिली सुर्यकिरणं शेतकऱ्यांच्या जीवनात आनंद घेवून येवोत... -संपादक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–५ | अंक–२४४ | गुरूवार दि.०१ जानेवारी २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## थोडक्यात...

### १५ जानेवारीला राज्यात शासकीय सुटी

मुंबई : राज्यातील नोकरदार वर्गासाठी मोठी बातमी. १५ जानेवारी रोजी मुंबई, ठाण्यासह २९ महापालिकांच्या निवडणुकांसाठी राज्य सरकारने 'भरपगारी सुटी' जाहीर केली आहे. खासगी कंपन्या, आयटी पार्क्स आणि मॉलमधील कर्मचा–यांनाही हा नियम लागू असेल. मतदानाचा हक्क बजावता यावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला आहे. तसेच सुटी न देणा–या आस्थापनांवर कडक कारवाईचा इशारा उद्योग आणि कामगार विभागाने दिला आहे.मुंबई, पुण्यासह राज्यातील २९ महापालिकांच्या निवडणुकीचा धुरळा उडाला आहे. १५ जानेवारी रोजी २९ महापालिकांसाठी मतदान होणार आहे. तर १६ जानेवारी रोजी निकाल जाहीर होणार आहे.

### दाते महाराष्ट्राचे नवे पोलिस महासंचालक

मुंबई : भारतीय पोलिस सेवेतील अधिकारी सदानंद दाते यांची महाराष्ट्र पोलिस महासंचालक(डीजीपी) म्हणून नियुक्ती निश्चित झाली आहे. राज्याच्या पोलिस महासंचालक रश्मी शुक्ला सेवानिवृत्त होणार आहेत. त्यांच्या जागी नवीन पोलिस महासंचालक कोण असेल याची चर्चा गेल्या महिन्यापासून सुरू होती. राज्याच्या गृह विभागाने त्यासाठी सात ज्येष्ठ आयपीएस अधिका–यांची नावे केंद्रीय लोकसेवा आयोगाकडे पाठवली होती.राष्ट्रीय तपास संस्थेचे (एनआयए) प्रमुख सदानंद दाते यांचे नाव यात प्रामुख्याने चर्चेत होते. केंद्रीय लोकसेवा आयोगाने सातपैकी तीन नावांची निवड करून ती राज्य सरकारकडे पाठवली होती.

### निष्ठावंतांना डावलल्याने भाजपमध्ये राडा

मुंबई : भाजपने निष्ठावंतांना डावलून उप–या लोकांना तिकिट दिल्यामुळे इच्छुक उमेदवारांच्या संयमाचा उद्रेक झाल्याची भावना काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी बुधवारी व्यक्त केली आहे. भाजपचे सध्याचे धोरण वापरा व फेकून द्या असे आहे. त्यामुळे संभाजीनगरात इच्छुक उमेदवार नाराज झाले असून भाजपमध्ये राडा तर होणारच अशी प्रतिक्रिया वडेट्टीवार यांनी दिली.महायुती तुटल्यानंतर छत्रपती संभाजीनगरात भाजपमध्ये उमेदवारी वाटपावरून सुरू झालेला गृहकलह आता जवळपास नियंत्रणाबाहेर गेला आहे. मंगळवारी रात्री भाजपच्या मध्यवर्ती प्रचार कार्यालयापुढे संतप्त कार्यकर्त्यांनी अभूतपूर्व गोंधळ घातला.

### टीम इंडियाकडून श्रीलंकेचा सुपडा साफ

तिरुवनंतपुरम : वूमन्स टीम इंडियाने हरमनप्रीत कौर हीच्या नेतृत्वात २०२५ या वर्षाचा अफलातून शेवट केला आहे. टीम इंडियाने तिरुवनंतपुरममधील पाचव्या आणि अंतिम सामन्यात श्रीलंकेवर १५ धावांनी मात केली आहे. टीम इंडियाने श्रीलंकेसमोर १७६ धावांचे आव्हान ठेवले होते. मात्र श्रीलंकेला २० ओव्हरमध्ये ७ विकेट्स गमावून १६० धावाच करता आल्या.यासह भारताने हा सामना जिंकला. भारताचा हा या मालिकेतील सलग पाचवा विजय ठरला. भारताने यासह श्रीलंकेला ५–० ने क्लिन स्वीप केलं. तर श्रीलंका भारत दौ–यासह २०२५ वर्षाचा शेवट विजयाने करण्यात अपयशी ठरली.

### पिंपरीत तब्बल ५ उमेदवारांचे एबी फॉर्म बाद

पुणे : महापालिका निवडणुकांसाठी अर्ज छाननी प्रक्रियेला आजपासून सुरुवात झाली असून अनेक ठिकाणी आक्षेप घेतल्याने उमेदवारांचे अर्ज बाद ठरत आहेत. मुंबईतील दोन प्रभागात भाजप उमेदवारांचे अर्ज बाद झाल्यानंतर आता पिंपरी चिंचवडमध्येही भाजपच्या तीन उमेदवारांना फटका बसला आहे. पिंपरी चिंचवडमध्ये भाजप आणि शिंदेंच्या शिवसेनेला मोठा धक्का बसला आहे. येथील प्रभाग २४ मधील भाजपच्या तीन जागेवरील आणि शिंदेंच्या शिवसेना पक्षातील दोन उमेदवारांचे एबी फॉर्म बाद ठरविण्यात आले आहेत. त्यामुळे, आता येथील उमेदवारांना अपक्ष निवडणूक लढवावी लागणार आहे.

### तिरंगी लढत;लातूरमध्ये महायुती ऐनवेळी तुटली

लातूर: राज्यामध्ये २९ महापालिकांची निवडणूक जाहीर झाली असून आज उमेदवारी अर्ज दाखल करण्याचा शेवटचा दिवस होता. राज्यामध्ये अनेक ठिकाणी माहिती होऊ शकली नाही यामुळे सत्ताधारी पक्षांना एकमेकांसमोर आव्हान उभे केले आहे. याच पद्धतीने लातूर शहर महानगरपालिकेसाठी काँग्रेस आणि वंचित बहुजन आघाडी यांची युती झाली मात्र भाजप राष्ट्रवादी आमने–सामने होताना दिसून येत आहेत. लातूर शहर महानगरपालिकेसाठी तिरंगी लढत पाहायला मिळणार आहे. लातूर शहर महानगरपालिकेसाठी एकूण १८ प्रभाग व ७० नगरसेवक अशी रचना आहे. २०१७ निवडणुकीमध्ये भाजप ३६ तर काँग्रेस ३४ अशा काठावर भाजपाकडे सत्ता गेली होती.

# कांदा उत्पादकांत कर्जबाजारीपणा वाढला !

## केंद्र सरकारचे धोरण कारणीभूत ; कांदा उत्पादक संघटनेचा गंभीर आरोप

पुणे । प्रतिनिधी

**कांद्याचे भाव पडल्याने २०२५ वर्षात उत्पादक शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. उत्पादन खर्च तर सोडाच वाहतूक खर्चही भरून निघाला नाही, एवढा कमी भाव कांद्याला मिळाला. या परिस्थितीला महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेने केंद्र सरकारला जबाबदार धरले आहे.**

केंद्राच्या बाजारातील हस्तक्षेपामुळे संपूर्ण २०२५ वर्षात देशातील कांदा उत्पादकांना मोठा आर्थिक फटका बसला, असा आरोप महाराष्ट्र राज्य कांदा उत्पादक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष भारत दिघोळे यांनी केला आहे. शेतकऱ्यांचे २०२५ वर्षात जे काही नुकसान झाले; त्याची भरपाई थेट अनुदानाच्या माध्यमातून देण्याची मागणी त्यांनी केली आहे. या मागण्या मान्य न झाल्यास राज्य आणि देशव्यापी आंदोलनाचा इशाराही त्यांनी दिला आहे. दिघोळे यांनी म्हटले आहे की, कांद्याचे भाव उत्पादन खर्चाच्या तुलनेत खूपच कमी राहिले. कांद्याचा उत्पादन खर्च प्रतिकिलो २२ ते २५ रुपये दरम्यान असताना, २०२५ वर्षात सरासरी बाजारभाव केवळ प्रतिकिलो ८ ते १८ रुपये मिळाला. महाराष्ट्रातील सर्व बाजार समित्यांमधून कांद्याच्या भावाचा आकडेवारीचा हवाला देत त्यांनी पुढे म्हटले आहे की, कांद्याला जानेवारीमध्ये प्रतिकिलो २० रुपये, फेब्रुवारीत २२ रुपये भाव मिळाला होता. मार्च महिन्यात १४ रुपये, एप्रिलमध्ये ८ रुपये, मे महिन्यात ९ रुपये, जूनमध्ये १३ रुपये, जुलै –ऑगस्ट दरम्यान १२ रुपये, सप्टेंबरमध्ये ९ रुपये, ऑक्टोबरमध्ये १० रुपये, नोव्हेंबरमध्ये १२ रुपये तसेच १ डिसेंबर ते ▶▶ पान २ वर

### भाव मुद्दामहून पाडल्याचा आरोप...

बफर स्टॉकमधील कांदा देशांतर्गत बाजारात खूप कमी भावात उपलब्ध करण्यात आला. यामुळे वर्षभर बाजारात कांद्याचे भाव वाढले नाहीत. तसेच भावात सुधारणा होण्याची शक्यताही निघून गेली. परिणामी, शेतकऱ्यांना तोटा सहन करुन खूप कमी भावात कांदा विकावा लागला. हे तर भाव पाडण्याचे नियोजित कटकारस्थान आहे. असा गंभीर आरोप दिघोळे यांनी केला आहे. शेतकरी आणि ग्राहकांच्या हिताच्या दृष्टीने असलेली बफर स्टॉक यंत्रणा ही प्रत्यक्षात दलालांच्या हिताची योजना बनली आहे. ज्यातून काही ठराविक घटकांना बोगस आणि निकृष्ट दर्जाच्या खरेदीच्या माध्यमातून फायदा झाला असल्याचेही त्यांनी निदर्शनास आणून दिले आहे.



# मुंडे यांना दिलासा!

## करुणा मुंडे यांची याचिका फेटाळली

बीड । प्रतिनिधी



माजी मंत्री धनंजय मुंडे यांना न्यायालयाकडून दिलासा मिळाला. विधानसभा निवडणूक २०२४ मधील त्यांच्या उमेदवारी अर्जासोबत जोडलेल्या शपथपत्रामध्ये उल्लेख केलेल्या माहितीवर आक्षेप घेण्यात आला होता. लोकप्रतिनिधी अधिनियम कायद्याच्या अंतर्गत गुन्हा दाखल करण्याबाबत प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी परळी वैद्यनाथ यांच्या न्यायालयात करुणा शर्मा–मुंडे यांनी फौजदारी कारवाई करण्याबाबत फिर्याद प्रकरण दाखल केले होते. याबाबत आज परळी न्यायालयाने निकाल दिला असून या प्रकरणातील सर्व आरोप तथ्यहीन असल्याचे सांगत फेटाळून लावले.

धनंजय मुंडे यांच्या नामनिर्देशन पत्रामध्ये नमूद माहितीवरून करुणा मुंडे यांनी वेगवेगळे आरोप करत ▶▶ पान २ वर

# संघटनेत क्रिकेटशी संबंध नसलेले सदस्य,रोहित पवारांना कोर्टात खेचले

पुणे । प्रतिनिधी

**रोहित पवार यांच्या अडचणीत आता चांगलीच वाढ झाली आहे. कारण भारताचा माजी खेळाडू केदार जाधव आता रोहित पवार यांच्याविरोधात उभा ठाकला आहे. केदार जाधवने रोहित पवार यांना थेट कोर्टात खेचल्याचे आता समोर आले आहे. रोहित पवार यांनी मोठा घोटाळा केला असल्याचे केदार जाधवचे म्हणणे आहे, त्यामुळे आता हे प्रकरण थेट कोर्टात गेल्याचे समोर आले आहे.**



रोहित पवार यांच्या अध्यक्षतेखालील कार्यकारिणी समितीने नुकतेच क्रिकेटशी संबंधित नसलेल्या चारशे जणांना महाराष्ट्र क्रिकेट संघटनेचे (एमसीए) आजीव सदस्यत्व बहाल केले. यातील बहुतांश जण पवार यांचे नातेवाइक, जवळचे संबंध असलेले आहेत. या सर्वांना सदस्यत्व देताना समितीने सर्व नियम धाब्यावर बसवले आहेत. ही 'घराणेशाही' रोखण्यासाठी माजी आंतरराष्ट्रीय क्रिकेटपटू केदार जाधव आणि लातूर जिल्हा क्रिकेट संघटनेचे अध्यक्ष कमलेश ठक्कर यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली आहे. 'घराणेशाही'ला स्थान दिल्याने संघटनेची सदस्य संख्या १६३ वरून ५७१वर पोहोचली आहे. हा सर्व घाट रोहित पवारांनी निवडणूक ▶▶ पान २ वर



## नववर्षाच्या पूर्वसंध्येला राजस्थानात १५० किलो स्फोटके जप्त

टोंक । वृतसंस्था


राजस्थानच्या टोंकमध्ये कारमधून १५० किलो स्फोटके (अमोनियम नायट्रेट) घेऊन जाणा–या २ लोकांना अटक करण्यात आली आहे. प्राथमिक चौकशीत समोर आले की हे अमोनियम नायट्रेट टोंकमध्येच पुरवले जाणार होते. हे प्रकरण बरौनी पोलिस स्टेशन हद्दीतील राष्ट्रीय ▶▶ पान २ वर

# दहावी-बारावी परीक्षा सुरू होण्याआधीच वादात

## मुख्याध्यापक महासंघाचा व्यवस्थापनावर बहिष्काराचा इशारा

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या दहावी, बारावी परीक्षा सुरू होण्यापूर्वीच चर्चेत आली आहे. परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची अदलाबदल, परीक्षा हॉलमध्ये 'सीसीटीव्ही' निर्णयाला मुख्याध्यापक संघाने विरोध केला. 'सीसीटीव्ही'साठी सरकारने अनुदान द्यावे तर कर्मचारी अदलाबदल शिक्षकांवर अविश्वास व्यक्त करणारा निर्णय असल्याचे सांगत परीक्षेवर परीक्षेचे व्यवस्थापन इतर



यंत्रणेकडून करून घ्यावे, परीक्षा संचलनात मुख्याध्यापक सहभागी होणार नाहीत असा ईशारा मुख्याध्यापक महासंघाने दिला आहे.

राज्य मंडळाच्या वतीने फेब्रुवारी–मार्च २०२६ मध्ये ▶▶ पान २ वर

### महासंघाचे काय आहे म्हणणे...

मुख्याध्यापक महासंघाने निवेदनात म्हटले आहे, सीसीटीव्ही कॅमेरे लावायचे असतील तर प्रत्येक केंद्राला अनुदान देण्यात यावे. तसेच कर्मचारी अदलाबदलीमुळे परीक्षा कालावधीत किमान एक महिना शाळा बंद राहतील व पेपर तपासणीमध्ये अडचणी येतील. त्यासह कर्मचारी अदलाबदलीचा निर्णय मुख्याध्यापक, शिक्षकांवर अविश्वास व्यक्त करणारा आहे. निर्णय परत न घेतल्यास मुख्याध्यापक महासंघ परीक्षेवर बहिष्कार टाकेल.

# भाजपचे धक्कातंत्र, नव्या चेहऱ्यांना संधी

पुणे । प्रतिनिधी

**पुणेसह नागपूर आणि इतर काही महानगरपालिकेच्या निवडणुकीत भाजपने अनेक दिग्गज नगरसेवकांना थेट घरी बसवत त्यांच्या जागी नव्या दमाच्या तरुणांना संधी दिली आहे. विशेष म्हणजे फक्त आंदोलन आणि घोषणाबाजीपुरते मर्यादित असलेल्या भाजयुमोच्या तब्बल ११ तरुण पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना नागपुरात भाजपने नगरसेवक पदासाठीची संधी दिली. त्यामुळे भाजपमध्ये तरुणांना संधीचे एक नवीन पर्व सुरू झाला आहे की काय? असा प्रश्न निर्माण झाला आहे.**

पुण्यात भाजपकडून विद्यमान नगरसेवकांची तिकीट कापून नव्यांना संधी देण्यात आली आहे. पुण्यात भाजपने यंदा निम्म्या माजी नगरसेवकांना उमेदवारी नाकारल्याचे बघायला मिळाले आहे. विशेष म्हणजे त्यात काही आमदार आणि नेत्यांच्या मुलांनाही पक्षाने उमेदवारी नाकारली आहे. पुण्यातील ४२ विद्यमान नगरसेवकांचे तिकीट भाजपने कापले आहे. त्यामुळे दिग्गज नगरसेवकांना धक्का बसला आहे. त्यातच नव्या चेह–यांना संधी मिळाल्याने पुणे, नागपुरात बरेच नवे नगरसेवक पाहायला मिळणार आहेत. त्यातच जुन्या, जाणत्या नगरसेवकांना वगळल्याने ब–याच ठिकाणी नाराजीचा स्फोट झाला आहे, तर काही ठिकाणी बंडखोरीही झाली आहे. त्यामुळे भाजपमधील ▶▶ पान २ वर

# धाराशिव विमानतळासह चार विमानतळ हस्तांतरणास मंजुरी



मुंबई । प्रतिनिधी

राज्यातील सर्व विमानतळांच्या विकासकामांमध्ये तसेच धोरणनिर्मितीमध्ये सुसूत्रता राहावी,या उद्देशाने महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीची समन्वयक म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.केंद्र शासनाची 'उडान' योजना राज्यात प्रभावीपणे राबविण्यासाठी भारतीय विमानतळ प्राधिकरण केंद्र शासनासाठी नोडल एजन्सी म्हणून काम पाहते,तर राज्यात ही योजना राबविण्यासाठी महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीची नोडल एजन्सी म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री तथा अध्यक्ष,महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या संचालक मंडळाच्या १९ व्या बैठकीत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या अखत्यारित असलेली बारामती,लातूर,धाराशिव आणि यवतमाळ ▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.३१ डिसेंबर २०२५

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ४२.०० क्विंटल | २,२७० | ३,०४० | २,५९४ |
| ज्वारी/हायब्रिड : ५१.०० क्विंटल | २,००० | ४,१०० | ३,०५६ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ४७.५० क्विंटल | ५,८०० | ६,८०१ | ६,४३७ |
| उडीद : १५.०० क्विंटल | ५,२९० | ५,८०० | ५,६७८ |
| बाजरी: १८.०० क्विंटल | २,३५१ | ३,१५० | २,८३५ |
| मुग:२.०० क्विंटल | ५,७५० | ६,३०० | ६,००३ |
| सोयाबीन: ७४.५० क्विंटल | ४,१०० | ४,७९० | ४,६०५ |
| हरभरा: १५.५० क्विंटल | ४,३०० | ५,४१० | ४,९६५ |

# सोशल मीडियावरील अश्लील मजकुरावर तात्काळ कारवाई करा

## केंद्र सरकारचा फेसबुक, इन्स्टाला कडक इशारा

नवी दिल्ली । वृतसंस्था

सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर वाढत्या अश्लील कंटेन्ट आणि आक्षेपार्ह मजकुराबाबत केंद्र सरकारने आता अत्यंत कठोर भूमिका घेतली आहे. फेसबुक, इन्स्टाग्राम आणि एक्स (पूर्वीचे ट्विटर) यांसारख्या मोठ्या सोशल मीडिया कंपन्यांना केंद्र सरकारने स्पष्ट शब्दांत ताकीद दिली असून अश्लील मजकुरावर तातडीने कारवाई न केल्यास गंभीर कायदेशीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असा इशारा सरकारने दिला आहे.

इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान



मंत्रालयाने (इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय) जारी केलेल्या ताज्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार, सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर अश्लील, ▶▶ पान २ वर

### कायदेशीर परिणाम

जर कंपन्यांनी या इशा–याकडे दुर्लक्ष केले, तर त्यांना केवळ आयटी कायद्यांतर्गतच नव्हे, तर भारतीय न्याय संहिता (आयपीसी) आणि इतर फौजदारी कायद्यांनुसार खटल्यांना सामोरे जावे लागेल. केंद्र सरकारने यापूर्वीही अनेक अश्लील ओटीटी प्लॅटफॉर्मवर बंदी घालून आपली भूमिका स्पष्ट केली आहे. आता मोठ्या सोशल मीडिया कंपन्यांनीही त्यांच्या प्लॅटफॉर्मचा वापर चुकीच्या कामांसाठी होऊ नये, याची खबरदारी घेणे अनिवार्य झाले आहे.

# बँक बंद होणार!

## निवडणुकीच्या तोंडावर उडाली अफवा

बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यातील वडवणी शहरात 'बुलढाणा अर्बन को–ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटी'ची शाखा कायमची बंद होणार असल्याची एक अफवा वाऱ्यासारखी पसरली आणि पाहता पाहता संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले. या अफवेमुळे आपले पैसे आणि सोने सुरक्षित राहावे या उद्देशाने खातेदारांनी बँकेसमोर तोबा गर्दी केली होती. पहाटेपर्यंत नागरिक रांगेत उभे असल्याचे चित्र पाहायला मिळाले.**

गेल्या काही दिवसांपासून वडवणी परिसरात बुलढाणा अर्बन बँक डबघाईला आली असून शाखा बंद होणार आहे, अशी चर्चा सुरू झाली. या एका अफवेने खातेदारांमध्ये घबराट पसरवली. काल सायंकाळपासूनच खातेदारांनी बँकेकडे धाव घेण्यास सुरुवात केली. रात्री उशिरापर्यंत गर्दी वाढतच गेली आणि पहाटेपर्यंत नागरिक ▶▶ पान २ वर

अग्रलेख

# राजकीय निष्ठा आणि नैतिकतेला तिलांजली !

महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने राज्यात युती आणि आघाड्यांचे राजकारण चरणसीमेवर पोहोचल्याचे दिसून आले. कोण कोणाशी युती करणार आहे हे पक्षांचे नेते अखेरच्या क्षणी देखील सांगू शकले नाहीत. सगळ्याच पक्षांची सरमिसळ झाली आहे. ध्येयधोरणे, तत्वे, निष्ठा ही मूल्ये फक्त तोंडी लावण्यापुरती उरली असावीत अशीच सद्यस्थिती आहे. पक्ष माझा वेगळा असा तोरा एकही पक्ष मिरवू शकणार नाही. कार्यकर्त्यांना मात्र उपदेशाचे डोस पाजण्यात सगळेच आघाडीवर आहेत. 'निष्ठा विकू नका.. पक्षाची धोरणे निकाली काढू नका..आता नाही तर कधीच नाही..' असे भावनिक आवाहन केले जात आहे. स्वतः मात्र सगळ्या पक्षप्रमुखांनी आपापल्या सोयीने भूमिका घेतली असल्याचे या निवडणुकीत दिसून आले आहे.

सर्वच पक्ष आणि त्यांच्या नेत्यांची भूमिका ही लोका सांगे ब्रह्मज्ञान असे झाले. झेंडे कार्यकर्त्यांनी उचलायचे. घोषणा त्यांनीच द्यायच्या. सभांना गर्दी करायची. खुर्च्या त्यांनीच टाकायच्या आणि उचलायच्या. चोवीस तास पक्ष डोक्यात ठेवायचा. पक्षकाम करून जेवायला मात्र घरीच जायचे अशीच तमाम नेत्यांची अपेक्षा असते आणि ती वेळोवेळी व्यक्तही केली जाते. पण पक्षनेत्यांचे काय? कार्यकर्त्यांच्या त्यांच्याकडून काहीच अपेक्षा नसतात असा नेत्यांचा भ्रम झाला असावा का? त्यामुळेच कार्यकर्त्यांना गृहीत धरले जात असावे का? राजकारणात कोणीच कायमचा शत्रू किंवा मित्र नसतो असे म्हणून वाट्टेल तशा कोलांटउड्या सुरु आहेत. जे वरती तेच खालती पाझरते. त्याच न्यायाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये नैतिक राजकारणाचा बोजवारा वाजले असल्याचे दिसत आहे.

सगळ्याच इच्छुकांना पक्षाच्या ए-बी फॉर्मची प्रतीक्षा होती आणि ते नाही मिळाले तर त्यांचेही 'प्लॅन बी' होते हे झालेल्या कालच्या घटनेवरून दिसून आले. त्यांचेच पक्ष दिवसाकाठी निष्ठा विकून खात असतील तर त्यांनी तरी काय करावे ? त्यांचे वेगळे नियोजन करण्यात काहीच गैर नाही अशी भावना इच्छुक व्यक्त करत असतील त्यात गैर मानले जाऊ शकेल का? कुरघोड्या, पक्षबदल आणि पक्षप्रवेशांना कार्यकर्तेही वैतागले नसते तरच नवल. उसन्याच उमेदवारांना तिकिटे द्यायची होती तर कार्यकर्त्यांना आशा का दाखवल्या? कार्यकर्त्यांनी किती दिवस सतरंज्या उचलायच्या? किती दिवस फक्त खुर्च्या टाकायच्या? अशा प्रश्नांचा सामना सगळ्याच पक्ष नेतृत्वांना करावा लागतो आहे.

एखाद्या निवडणुकीच्या विजयाचे गणित चुकले म्हणून पक्षांना फारसा फरक पडत नसतो. पण कार्यकर्त्यांचे तसे नाही. एक निवडणूक चुकली की, त्यांना संधी मिळण्यासाठी पुढची पाच वर्षे प्रतीक्षा करावी लागते. शिवाय, निवडणूक लढवणे येरा गबाळाचे काम राहिलेले नाही. ज्याचे आर्थिकबळ जास्त त्याला पायघड्या अशी स्थिती आहे. तळागाळातील निवडणूक लढवणे म्हणजे कोटींचा खेळ असे कार्यकर्ते म्हणतात. यावेळी तर न्यायसंस्थेने मर्यादाच घालून दिल्याने निवडणूक आयोगाचाही नाइलाज झाला असणार. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीला आठ वर्षांनी मुहूर्त सापडला आहे. त्यामुळे अनेक इच्छुकांची संधी हुकलेली असल्याचे जाहीर आहे.

आयाराम-गयाराममुळे इच्छुकांची संख्या प्रचंड वाढली आहे. तिकीट मिळवण्यासाठी स्पर्धा नसती तरच नवल. मिळेल त्या मार्गाने किंवा पद्धतीने तिकिटे मिळवणे हीच बहुसंख्यांची महत्वाकांक्षा आणि जो पक्ष संधी देईल तो पक्ष इच्छुकांचा असे वास्तव आढळते. पक्षांना देखील त्यांच्या तथाकथित निष्ठावान उमेदवारांची खात्री वाटत नसावी. म्हणूनच ए-बी फॉर्म मुदतीच्या शेवटच्या अर्ध्या तासात देण्याची नवपरंपरा अलीकडच्या काळात राजकारणात रुजली असावी. त्याचेही कारण अलीकडच्या राजकारणात दडलेले सापडते. 'जे न देखे रवी, ते देखे कवी' असे म्हणतात. पण ते किती खरे असावे? कविवर्य मंगेश पाडगावकर यांची एक कविता आहे. 'थोर आपण मानिली, ही भ्रष्ट सारी माकडे, अन्? दिले हातांत त्यांच्या, पेटलेले काकडे! काल ज्या झाडांवरी, ही आश्रयाला थांबलीआज ही शत्रूप्रमाणे, पाहती त्यांच्याकडे ! पक्ष यांचा कोठला, टोळी तयांची कोठली ? जात यांची एक अंती, प्रश्न सारे तोकडे !' हे वर्णन जरी प्राणिसृष्टीचे वाटत असले तरी सध्याच्या राजकारणाला ते चपखल लागू पडू शकेल. १९८१ साली लिहिलेले विडंबन आजही तंतोतंत लागू पडत असेल तर त्यापेक्षा वेगळी शोकांतिका दुसरी कोणती असेल.

# अपक्ष नगरसेवक मुरकुटे, इस्माईल शेख, रोडे यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश



**परळी वै.। प्रतिनिधी**

**परळी नगर परिषद निवडणुकीत अपक्ष म्हणून निवडून आलेले नगरसेवक लक्ष्मण मुरकुटे, इस्माईल शेख (मंगलदादा) तसेच अर्चना रोडे यांचे पती महेंद्र रोडे यांनी आज राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री आ. धनंजय मुंडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केला असून, त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेस व महायुतीच्या नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार सौ पद्मश्री बाजीराव धर्माधिकारी यांना जाहीर पाठिंबा दिला आहे.**

नगर परिषद निवडणुकीत धनंजय मुंडे यांच्या सह मंत्री पंकजाताई मुंडे यांच्या नेतृत्वाखाली परळी नगर परिषद निवडणुकीत एकहाती सत्ता मिळवली होती. त्यानंतर आज अपक्ष म्हणून निवडून आलेल्या तीन नगर सेवकांनी जाहीर पक्ष प्रवेश केला आहे. याप्रसंगी जिल्हा परिषद गटनेते अजय मुंडे, बाजीराव भैय्या धर्माधिकारी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, यांच्यासह स्थानिक पदाधिकारी आदी उपस्थित होते.

# जालना महानगरपालिका निवडणूक संवेदनशील मतदान केंद्रावर विशेष लक्ष ठेवा-मुख्य निवडणूक निरीक्षक जगदीश मिनीयार

**जालना । प्रतिनिधी**

**जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणुक २०२५-२६ च्या पार्श्वभूमीवर महापालिका निवडणुकीसाठी दि. १५ जानेवारी २०२६ रोजी मतदान होणार आहे. तरी मतदान प्रक्रिया निर्भय व शांततेत पार पाडण्यासाठी संवेदनशील मतदान केंद्रावर विशेष लक्ष ठेवावे, असे प्रतिपादन मुख्य निवडणूक निरीक्षक जगदीश मिनीयार यांनी केले.**



जिल्हाधिकारी कार्यालयातील सभागृहात महानगरपालिका निवडणूकीच्या अनुषंगाने बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. या प्रसंगी ते बोलत होते. तसेच मुख्य निवडणूक निरीक्षक यांनी जालना शहरातील मतदान केंद्रावरील भेट देऊन पाहणी केली.यावेळी जिल्हाधिकारी आशिमा मित्तल, सहाय्यक निवडणूक निरीक्षक हरीश धार्मिक, जि.प. मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नू पी.एम., पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल, अपर जिल्हाधिकारी रमेश मिसाळ, निवासी उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल यांच्यासह निवडणूक निर्णय अधिकारी, सहायक निवडणूक निर्णय अधिकारी आणि नोडल अधिकारी यांची उपस्थिती होती. निवडणूक कर्तव्यावर असलेल्या कर्मचाऱ्यांची संख्या आणि त्यांच्या प्रशिक्षणाबाबत माहिती जाणून घेऊन मतदान प्रक्रिया शांततेत आणि सुरळीत होण्यासाठी सर्व यंत्रणा सज्ज राहतील याची दक्षता घेण्याबाबतची सूचना केली. शहरातील मतदान केंद्रावरील व्यवस्था, संवेदनशील मतदान केंद्रावरील व्यवस्था, दिव्यांग मतदारांसाठी व्यवस्था, पाणी, वीज व रॅम्पची व्यवस्था इत्यादी बाबीबरोबरच शस्त्र जमा केल्याचा आढावा यावेळी घेण्यात आला. जमा न झालेली सर्व शस्त्रास्त्रे जमा करून घेण्याचे निर्देशही त्यांनी यावेळी दिले. मतदान यंत्र आणि मतदानासाठी यंत्रांची सज्जता याविषयी आढावा घेऊन मतदानानंतर सर्व मतदान यंत्रे जमा करण्याचे व त्याची सुरक्षितता याबाबतही विविध सूचना दिल्या. अवैध दारू विशेषतः निवडणूक काळात अवैध मद्य वाहतूक आणि साठा रोखण्यासाठी राज्य उत्पादन शुल्क विभागाने कडक प्रतिबंधात्मक कारवाई करावी, अशा स्पष्ट सूचना श्री. मिनीयार यांनी यावेळी दिल्या. जालना शहर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूकीसाठी उमेदवारांना तात्पुरते प्रचार कार्यालय, रॅली, प्रचार सभा, उपसभा, मिरवणूक, वाहन, लाऊड स्पीकर, झेंडे, बॅनर, पोस्टर्स, ड्रोन कॅमेरे आदीच्या परवानगीसाठी एक खिडकी परवानगी कक्ष महानगरपालिकेत सुरू करण्यात आलेला आहे. आदर्श आचारसंहिता कक्षाचा टोल फ्री क्रमांक ०२४८२ २२३१३२ असा आहे. तसेच आचारसंहिता कक्ष जिल्हाधिकारी कार्यालयात स्थापन करण्यात आलेला आहे. विविध भरारी पथकांची स्थापना, मनुष्यबळ, वाहने, चेकपोस्ट, भरारी पथके, प्रतिबंधात्मक कार्यवाही, साहित्य व्यवस्थापन, स्वीप अंतर्गत मतदानाविषयी करण्यात आलेली जनजागृती तसेच आतापर्यंत करण्यात आलेली कार्यवाही आदीची माहिती जिल्हाधिकारी तथा महापालिका आयुक्त आशिमा मित्तल यांनी संगणकीय सादरीकरणाद्वारे यावेळी दिली.

# राजस्थानीचे वर्गमित्र ३८ वर्षानी एकत्र भेटले :जुन्या आठवणीना दिला उजाळा

**बीड । प्रतिनिधी**

**द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय इयत्ता दहावी इसवी सन १९८८ ,८९ बॅचचे स्नेहसंमेलन गुरुवर्य श्री छाजेडसर जी यांच्या उपस्थितीत संतकृपा फार्म हाऊस ( रायते फार्म हाऊस) येथे उत्साहात नुकतेच संपन्न झाले.**




तब्बल ३८ वर्षांनी सर्व अल्लड मित्र मैत्रीणीना एकत्र येऊन आपल्या जुन्या आठवणींना उजाळा दिला .या वेळी वर्गातील १५० जनापैकी जवळपास ८० जण उपस्थित होते.प्रारंभी त्यावेळी असलेले वर्ग शिक्षक छा जेड सर यांचे स्वागत व सत्कार करण्यात आला.त्या नंतर दीप प्रज्वलन करुन कार्यक्रम सुरू करण्यात आला.एके काळी अल्लड असलेले हे विद्यार्थी आता विविध क्षेत्रात नावलौकिक मिळविला आहे.मात्र यानिमित्ताने पुनः एकदा सर्वांनी दिवसभर एकमेकाचे सानिध्यात राहून आनंदी वातावरणात पुन्हा भेटण्याची इच्छा व्यक्त केली.यावेळी दत्ता तळेकर यांनी आपल्या सुरेल आवाजात विविध गीते सादर करून मंत्रमुग्ध केले.या कार्यक्रमासाठी अहिल्यानगर येथील रचना महाविद्यालयाच्या संचलिका वर्षा कांबळे, पुणे महापालिकेतील अलका रामदासी,जालना येथे शिक्षीका प्रभा जाधव, उद्योजक रामेश्वर डरफे, यांनी मनोगत व्यक्त केले. मनसेचे महाराष्ट्र राज्य उपाध्यक्ष अशोकजी तावरे , गिरीशजी करवा , सोमनाथ जी रुक्कर , सुरेश जी कोरडे सॉफ्टवेअर हे इंजिनियर पुणे व सर्वजण वर्ग मित्र व बाहेर गावाहून मैत्रिणी या कार्यक्रमासाठी आवर्जून आले होते. शेवटी आभार -अलका रामदासी यांनी मानले.

# नववर्षाच्या पूर्वसंध्येला धनंजय मुंडे पंढरपूर येथे पांडुरंगाच्या दर्शनाला

## श्री संत माधवमामा मठाच्या वास्तूचे धनंजय मुंडे यांच्या हस्ते भूमिपूजन

**पंढरपूर । प्रतिनिधी**

**माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज नवीन वर्षाच्या पूर्वसंध्येला श्रीक्षेत्र पंढरपूर येथे जाऊन श्री विठ्ठल रुक्मिणीचे दर्शन घेतले. उद्या इंग्रजी नवीन वर्ष सुरू होत असून या नवीन वर्षात महाराष्ट्रातील जनतेला सुख समृद्धी नांदू दे यासह महाराष्ट्रातील सलोखा कायम अबाधित राहू दे असे साकडे धनंजय मुंडे यांनी पांडुरंगाच्या चरणी घातले आहे.**

याप्रसंगी श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर समितीच्या वतीने श्री धनंजय मुंडे यांचा विठ्ठल रुक्मिणीची मूर्ती देऊन सत्कार करण्यात आला. यावेळी परळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती सूर्यभान नाना मुंडे, परळी पंचायत समितीचे माजी सभापती बालाजी मुंडे, यांच्यासह पंढरपूर येथील पदाधिकारी आदी उपस्थित होते. दरम्यान बीड जिल्ह्यासह



मराठवाड्यातील संत ज्ञानेश्वरांचे अनुयायी व भक्त म्हणून ओळखले जाणारे आचार्य ह. भ. प. अर्जुन महाराज लाड गुरुजी यांच्या पुढाकारातून श्री संत माधव मामा यांच्या नावाने वारकरी व भाविकांच्या सेवेसाठी प्रशस्त मठाची उभारणी करण्यात येत असून या वास्तूच्या कामाचे भूमिपूजन श्री धनंजय मुंडे यांच्या हस्ते व संत - महंत आणि स्थानिक पदाधिकाऱ्यांच्या उपस्थितीत संपन्न झाले.

# पान १ वरून...

## कांदा उत्पादकांचा कर्जबाजारीपणा

१५ डिसेंबरच्या कालावाधीत १४ ते १५ रुपये आणि १५ डिसेंबरनंतर प्रतिकिलो १८ रुपये भाव मिळाला. ''हे भाव कांद्याच्या उत्पादन खर्चाच्या तुलनेत खूपच कमी आहेत. कांद्याला खूप भाव मिळणे हे शेतकऱ्यांच्या नुकसानीचे आणि त्यांच्या वाढत्या कर्जबाजारीपणाचे मुख्य कारण आहे,'' असे दिघोळे यांनी म्हटले आहे.देशात कांद्याची पुरेशी उपलब्धतता असतानाही, सरकारने बफर स्टॉक तयार करण्यासाठी राष्ट्रीय कृषी सहकारी विपणन महासंघ (नाफेड) आणि राष्ट्रीय सहकारी ग्राहक महासंघ (एनसीसीएफ) यांच्या माध्यमातून सुमारे ३ लाख टन कांद्याची खरेदी केल्याचा आरोपही त्यांनी केला. दरम्यान, कांद्याची शेतकऱ्यांकडून थेट खरेदी करण्याऐवजी, मध्यस्थ, कंत्राटदार आणि खासगी एजन्सींच्या माध्यमातून खरेदी करण्यात आली. यामुळे मोठ्या प्रमाणात अनियमितता आणि आर्थिक गैरव्यवहार झाल्याचा दावाही त्यांनी केला आहे.

------------

## नववर्षाच्या पूर्वसंध्येला राजस्थानात

महामार्ग-५२ वरील चिरौंज गावातील आहे. कारमधील लोकांनी युरिया खताच्या गोण्यांमध्ये हे स्फोटक लपवून ठेवले होते, जेणेकरून ते पकडले जाऊ नयेत. डीएसपी मृत्युंजय मिश्रा यांनी सांगितले की हे अमोनियम नायट्रेट कोणत्याही स्फोटाची घटना घडवून आणण्यासाठी पुरेसे आहे. या लोकांनी स्फोटके कोठून, कोणाकडून खरेदी केली होती आणि कोणाला पुरवणार होते, याची चौकशी सुरू आहे.दोन्ही आरोपींनी कारमध्ये खताच्या गोण्यांमध्ये स्फोटके लपवली होती, जेणेकरून कोणालाही संशय येऊ नये. बूंदीच्या दिशेने येत होते, पाठलाग केल्यावर पळून जाऊ लागले डीएसटी प्रभारी ओमप्रकाश चौधरी यांनी सांगितले की महामार्गावर नाकाबंदी होती. सकाळी ९ वाजता बूंदीहून टोंकच्या दिशेने एक सियाज कार जात होती. त्यात युरिया खताच्या गोण्या भरल्या होत्या. टीमला कारमधील लोक संशयास्पद वाटले, म्हणून त्यांचा पाठलाग केला.यावर कारमधील सुरेंद्र(४८) आणि सुरेंद्र मोची (३३) रा. करवर (बूंदी) महामार्गावरून चिरौंज गावाच्या दिशेने पळून जाऊ लागले. टीमने पाठलाग करून त्यांना गावाबाहेर थांबवले. त्यांनी सांगितले की, कारमधील लोकांना थांबवून चौकशी केली असता ते घाबरले.

--------------

## संघटनेत क्रिकेटशी संबंध नसलेले

डोळ्यासमोर ठेऊन घातला आहे. विद्यमान अध्यक्ष रोहित पवार यांचा कार्यकाळ संपुष्टात येत आहे. सहा जानेवारीला 'एमसीए'ची निवडणूक आणि मतमोजणी होणार आहे. आता महाराष्ट्रातील क्रिकेटचे भवितव्य कोर्टाच्या हातात असल्याची भावना माजी कर्णधारांनी व्यक्त केली.धर्मादाय आयुक्तांच्या नियमानुसार संघटेनेचे सदस्य वाढवण्याचा ठराव बैठकीत मांडला जातो. पुढील बैठकीत त्यास मान्यता मिळवावी लागते. आजीव सदस्य केलेल्यांची फी जमा झाल्यावरच वार्षिक सभेत हा विषय मांडला जातो. मात्र, यातील कुठलाही नियम पाळला गेलेला नाही. 'एमसीए'ची अखेरची बैठक १३ डिसेंबरला झाली. यात आयत्या वेळेचा विषय म्हणून सदस्याचा मुद्दा घुसविण्यात आला होता. रोहित पवार यांच्याविरोधात केदार जाधवने बंद पुकारले असून तो कोर्टात गेला आहे. यामध्ये केदार जाधवला नेमकं किती यस मिळवतं, याकडे सर्वांचे लक्ष लागलेले असणार आहे.

------------------

## मुंडे यांना दिलासा!

शपथपत्रात खोटी माहिती दिल्याचा आरोप करत लोकप्रतिनिधी अधिनियमांतर्गत गुन्हा दाखल करण्याची मागणी केली होती. याप्रकरणी परळीच्या प्रथमवर्ग न्यायालयात सुनावणी पार पडली.करुणा मुंडे यांनी नोंदवलेला जबाब, वकिलांचा युक्तिवाद यांसह वस्तुस्थिती लक्षात घेत न्यायालयाने करुणा मुंडे यांनी दाखल केलेली फिर्याद फेटाळून लावली आहे. दरम्यान, धनंजय मुंडे यांच्या बाजूने न्यायालयाने आणखी एक निकाल दिला आहे. याआधी देखील कृषी विभागाच्या खरेदीवरून निरनिराळे आरोप करत धनंजय मुंडे यांच्या विरोधात मुंबई उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या याचिकेमध्ये देखील कोणतेही तथ्य आढळले नाही आणि ते प्रकरण देखील मुंबई उच्च न्यायालयाने फेटाळून लावत तक्रारदाराला उलट दंड लावला होता.

----------------

## भाजपचे धक्कातंत्र,

असंतोष चव्हाट्यावर आला असून, याचा फटका भाजपला बसण्याची शक्यता आहे.

-----------------

## दहावी-बारावी परीक्षा सुरू

घेण्यात येणाऱ्या दहावी, बारावी परीक्षांची तयारी सुरू आहे. बारावीच्या परीक्षेला १० फेब्रुवारीपासून सुरुवात होणार आहे. परीक्षेसाठी परीक्षा केंद्रांची निश्चितीही नुकतीच करण्यात आली. तर कॉपीमुक्त परीक्षा, परीक्षेतील गैरप्रकार रोखण्यासाठी मंडळाकडून उपाययोजना करण्यात येत आहेत. त्यानुसार यंदा सर्वच परीक्षा केंद्रांवर आणि वर्गखोल्यांमध्ये सीसीटिव्हीची सक्ती करण्यात आली आहे. यासोबतच सर्व परीक्षा केंद्रावरील कर्मचाऱ्यांची अदलाबदल करण्यात येणार आहे. आता या निर्णयावरुन मंडळ आणि मुख्याध्यापकांमध्ये वाद समोर आला आहे. मुख्याध्यापक संघाने निर्णयाला विरोध असल्याचे म्हटले आहे. महाराष्ट्र राज्य मुख्याध्यापक महासंघाने मंडळाला निवेदन देत निर्णयाबाबत नाराजी व्यक्त केली. त्यामुळे परीक्षा सुरू होण्यापूर्वीच चर्चेत आली आहे. निवेदनावर महासंघाचे युनुस पटेल, मनोज पाटील, किरण मास्ट, सुनील जाधव, पी. एम. पवार, संध्या काळकर, धनपाल खोकड, सुरेखा शिंदे, सुजाता पवार, गुलाबचंद बोराळकर, लता शिंदे, विजया मळवणे, अलका खोडे, शेख वाहेद, आर. व्ही. वळवी, डी. टी. मोरे, व्ही. एम. वाघ, एन. आर. गोसावी, एच.आर. कळवणे, एस. डी. कुलकर्णी आदींची नावे आहेत.

-----------

## धाराशिव विमानतळासह चार विमानतळ

ही विमानतळे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे हस्तांतरित करण्याबाबत प्रक्रिया सुरू करण्याचे निर्देश देण्यात आले होते. त्यानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने बारामती विमानतळ दि. १९/०८/२०२५ रोजी,धाराशिव विमानतळ दि.२०/०८/२०२५ रोजी, लातूर विमानतळ दि.२९/०८/२०२५ रोजी आणि यवतमाळ विमानतळ दि. १८/०९/२०२५ रोजी औपचारिकरित्या हस्तांतरित करण्याबाबत सामंजस्य करार केला आहे.यानुसार शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.३० डिसेंबर २०२५ रोजीच्या शासन निर्णयानुसार महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून बारामती विमानतळ,लातूर विमानतळ,धाराशिव विमानतळ व यवतमाळ विमानतळ ही विमानतळे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे हस्तांतरित करण्यास मान्यता देण्यात येत आहे. महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीने सदर विमानतळांचा विकास / विस्तार करावा, तेथे विमानसेवेसाठी आवश्यक त्या सुविधा उपलब्ध करून द्याव्यात व या विमानतळांची धावपट्टी विमानसेवेसाठी उपयुक्त / सुस्थितीत ठेवावी.महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाकडून ही विमानतळे महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीकडे हस्तांतरित करण्यात येत असली,तरी मूळ मालकी हक्क शासनाकडे कायम राहील.बारामती,लातूर,धाराशिव व यवतमाळ विमानतळांबाबत भविष्यात राज्य शासन ज्या अटी व शर्ती विहित करेल किंवा जे धोरणात्मक बदल करेल ते महाराष्ट्र विमानतळ विकास कंपनीला बंधनकारक असतील.या निर्णयामुळे राज्यातील प्रादेशिक हवाई संपर्काला चालना मिळणार असून ''उडान'' योजनेअंतर्गत अधिक शहरांमध्ये विमानसेवा सुरू होण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

-------------

## बँक बंद होणार!

बँकेबाहेर ठाण मांडून बसले होते. गर्दी वाढल्यामुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. खातेदारांनी केवळ पैसे काढण्यासाठीच नव्हे, तर तारण ठेवलेले सोने सोडवून घेण्यासाठीही मोठी गर्दी केली होती. बीड जिल्ह्यामध्ये गेल्या काही वर्षांत ज्ञानराधा मल्टीस्टेट सह अनेक पतसंस्था आणि मल्टीस्टेट बँकांनी खातेदारांचे कोट्यवधी रुपये बुडवून गाशा गुंडाळला आहे. या कटू अनुभवांमुळे सामान्य नागरिक आधीच धास्तावलेले आहेत. याच भीतीचा फायदा अफवा पसरवणाऱ्यांनी घेतला, ज्यामुळे नागरिकांनी कोणत्याही अधिकृत माहितीची वाट न पाहता बँकेकडे धाव घेतली. बुलढाणा अर्बन बँकेने या सर्व अफवांचे खंडन केले आहे. बँक प्रशासन आणि व्यवस्थापनाने खातेदारांना आवाहन केले आहे की, कोणत्याही चुकीच्या किंवा अपुऱ्या माहितीवर विश्वास ठेवू नका. बँकेचे व्यवहार पारदर्शक आणि सुरक्षित आहेत.

--------------

## सोशल मीडियावरील अश्लील

लहान मुलांसाठी हानिकारक (पीडोफिलिक) आणि बेकायदेशीर मजकूर पसरत असल्याबद्दल चिंता व्यक्त केली आहे. सरकारने स्पष्ट केले आहे की, आयटी कायदा २०००च्या कलम ७९ अंतर्गत मिळणारे 'सेफ हार्बर' (कायदेशीर संरक्षण) हे अटींच्या अधीन आहे. जर या कंपन्यांनी त्यांच्या प्लॅटफॉर्मवरील आक्षेपार्ह मजकूर हटवण्यात कसूर केली, तर हे संरक्षण काढून घेतले जाईल आणि त्यांच्यावर गुन्हेगारी स्वरूपाची कारवाई केली केंद्र सरकारने सर्व सोशल मीडिया मध्यस्थांना त्यांच्या अंतर्गत देखरेख यंत्रणेचा (कंटेट मॉडरेशन) पुन्हा आढावा घेण्याचे आदेश दिले आहेत. विशेषत: लैंगिक छळ किंवा कोणाच्याही वैयक्तिक गोपनीयतेचा भंग करणा-या मजकुराबाबत तक्रार प्राप्त झाल्यानंतर २४ तासांच्या आत तो मजकूर हटवणे बंधनकारक आहे. आयटी नियम २०२१ नुसार, कंपन्यांनी अशा तक्रारींचे निवारण करण्यासाठी तत्पर राहणे आवश्यक आहे.

------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
गुरुवार दि. ०१ जानेवारी २०२६


## थोडक्यात

### श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी येथे शनिवारी योगिराज महाराज रामगडकर यांचे कीर्तन

बीड । प्रतिनिधी



विसाव्या शतकातील महान संत .किसनबाबा यांच्या २८ व्या वर्षातील पाचव्या पुण्यतिथी पौष शुद्ध पौर्णिमे निमित्त श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडी ता.जि.बीड येथे ह.भ.प.स्वामी योगिराज महाराज यांचे शनिवार दिनांक ३ जानेवारी २०२६ रोजी दुपारी १२ ते २ या वेळेत कीर्तन होणार आहे. तरी या किर्तनाचा व महाप्रसादाचा या परिसरातील भाविक भक्तांनी लाभ घ्यावा असे अवाहन श्रीक्षेत्र गोरक्षनाथ टेकडीचे गुरूवर्य शांतीब्रह्म ह.भ.प.नवनाथ महाराज यांची नम्रविनंती व समस्त गावकरी काळेगांव ता.जि.बीड यांच्याकडून महाप्रसादाचे आयोजन केले आहे. तसेच बाबांचा पालखी सोहळा सकाळी आठ वाजता सुरू होईल व गोरक्षनाथ टेकडी येथे गर्भांद्री पर्वत प्रदक्षिणामध्ये सकाळी ९ ते १० यावेळेत सहभागी होता येईल.




### वाढदिवसाचे औचित्य साधून, शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप

माजलगाव । प्रतिनिधी

वाढदिवसाचा खर्च नाहकपणे करून उधळपट्टी करण्यापेक्षा हाच पैसा विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक कार्यात उपयोगात आणून त्यांच्या गरजा पूर्ण केल्या तर विद्यार्थ्यांची शालेय गोडी वाढून त्यांच्या गरजा पूर्ण होवू शकतात. हा उद्दिष्ट डोळ्यापुढे ठेवून लोकनेते सुंदरराव सोळंके सह.साखर कारखान्याचे व्हाइस चेअरमन जयसिंग भैय्या सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त फेरोज खान यांनी माजलगाव तालुक्यातील सोमठाणा येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा सोमठाणा उर्दु- मराठी शाळेमध्ये विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करून वाढदिवस साजरा केला.जयसिंग भैय्या सोळंके यांच्या वाढदिवसानिमित्त सोमठाणा शाळेतील १७० विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप केले.त्यामध्ये वही,पेन,पेन्सिल व खाऊचे वाटप केले. यावेळी फेरोज इस्माईल खान, शालेय समितीचे अध्यक्ष अजित खान,उपाध्यक्ष अतिक खान, मूसा खान, अमजद खान, शेख आलिमोद्र, रमाकांत शेजूळ,मुख्याध्यापक संतोष लोकरे, शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी, आदी उपस्थित होते.

### निर्लेखित साहित्याचा लिलाव

बीड । प्रतिनिधी

जिल्हा व सत्र न्यायालय, बीड या कार्यालयातील निर्लेखीत करावयाच्या फर्निचर / जडवस्तु तसेच निररूपयोगी वस्तुंची जाहिर लिलाव पध्दतीने विक्री करावयाची आहे.

हा जाहिर लिलाव दि. ०८ जानेवारी २०२६ रोजी सकाळी ११:०० वाजता नवीन जिल्हा न्यायालय इमारतीच्या आवारात (प्रवेशव्दारा समोर) ठेवण्यात आलेला आहे. तसेच विक्री करावयाचे साहित्य / जडवस्तु दिनांक ०७ जानेवारी २०२६ रोजी कार्यालयीन वेळेत पाहता येईल. इच्छूक खरेदीदारांनी इतर सविस्तर अटी व शर्तींच्या माहिती करीता रूम नं. ३०९, लेखा व वित्त विभाग, जिल्हा न्यायालय, बीड येथे संपर्क साधावा असे आवाहन जिल्हा न्यायालयाचे प्रंबधक यांनी केले आहे.

# धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्ग भूसंपादनात कोट्यवधींचा घोटाळा

## तत्कालीन जिल्हाधिकारी पाठक यांना वाचविण्यासाठी सहा.महसूल अधिकारी संजय हांगेचा बळी

बीड । प्रतिनिधी

धुळेसोलापूर राष्ट्रीय महामार्गासाठी बीड जिल्ह्यात करण्यात आलेल्या भूसंपादन प्रक्रियेत कोट्यवधी रुपयांचा आर्थिक घोटाळा झाल्याचा गंभीर आरोप समोर आला आहे. या प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकारी मा. अविनाश पाठक यांची थेट जबाबदारी व सहभाग असल्याचा ठोस संशय व्यक्त केला जात असून, त्यांना तपासापासून दूर ठेवण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे आरोप करण्यात येत आहेत.

मिळालेल्या माहितीनुसार, महामार्गासाठी संपादित जमिनींच्या मोबदल्यासाठी सुरुवातीला ६८.५८ कोटी रुपये मंजूर असताना, ती रक्कम बेकायदेशीररीत्या वाढवून तब्बल २४१.६२ कोटी रुपयांनी वाढ करण्यात आली. परिणामी एकूण मोबदला ३१०.२० कोटी रुपये इतका झाला. यापैकी सुमारे ७५ कोटी रुपये बनावट आदेशांच्या आधारे थेट शेतकऱ्यांच्या खात्यावर वितरित करण्यात आल्याचा आरोप आहे.

विशेष बाब म्हणजे १ मार्च ते १७ एप्रिल २०२५ या अवघ्या ४८ दिवसांच्या कालावधीत १५४ आदेश काढण्यात आले असून, १७ एप्रिल २०२५ रोजी एकाच दिवशी ५० आदेश निर्गमित करण्यात आल्याचे समोर आले आहे. धक्कादायक बाब म्हणजे २२ एप्रिल २०२५ रोजी बदली झाल्यानंतरही तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या नावाने व सह्यांनी मागील तारखेचे आदेश काढण्यात आले, हा प्रकार संशयास्पद व गुन्हेगारी स्वरूपाचा असल्याचे तज्ज्ञांचे मत आहे.हे आदेश भूसंपादन विभागाच्या समन्वय शाखेकडे न पाठवता, थेट राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाकडे पाठवण्यात आल्याचे सांगितले जात आहे. यामध्ये महसूल विभागातील काही अधिकारी व राष्ट्रीय महामार्ग विभागातील एका कर्मचाऱ्याच्या संगनमताचा संशय व्यक्त करण्यात येत आहे.

तपासादरम्यान १२२ शेतकऱ्यांनी पोलिस जबाबात वाढीव मोबदल्यासाठी ''मदत'' करणाऱ्यांना ५ ते १५ टक्के कमिशन दिल्याची कबुली दिल्याचे समोर आले आहे. या प्रकरणात आतापर्यंत २ सहायक महसूल अधिकारी, ५ वकील आणि ३ कंत्राटी कर्मचारी यांच्यावर गुन्हे दाखल झाले असून, त्यापैकी ३ वकिलांना अटकपूर्व जामीन मंजूर झाला आहे.सदर प्रकरणाचा तपास एसआयटीकडे असला तरी, १४८ संचिका व २१ हजार कॉल रेकॉर्डिंग जप्त होऊनही मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप असलेल्या तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांचा जबाब अद्याप नोंदवण्यात आलेला नाही. त्यामुळे तपास यंत्रणांच्या भूमिकेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

तक्रारदारांच्या मते, तपास यंत्रणा व जिल्हा प्रशासनातील काही अधिकारी जाणीवपूर्वक मुख्य आरोपीला वाचवून दुय्यम अधिकाऱ्यांना बळी देण्याचा प्रयत्न करत आहेत. तसेच या प्रकरणाला जातीय रंग देऊन तपासाची दिशा बदलण्याचा प्रयत्न होत असल्याचा गंभीर संशय व्यक्त करण्यात आला आहे. बनावट असल्याचा आरोप करण्यात येणाऱ्या सह्या या प्रत्यक्षात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांच्या असल्याचे स्पष्ट असून, त्यामध्ये बनावटपणा नसल्याचा दावा केला जात आहे.या पार्श्वभूमीवर, सदर प्रकरणात तत्कालीन जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांना मुख्य आरोपी म्हणून तपासात समाविष्ट करून त्यांचा तात्काळ जबाब नोंदवावा, बनावट आदेशांवरील सह्या हस्ताक्षर तज्ज्ञांकडे (पुणे/नागपूर) इन-कॅमेरा तपासणीसाठी पाठवाव्यात, तसेच बनावट आदेशांच्या आधारे वितरित केलेला वाढीव मोबदला वसूल करण्याचा निर्णय घ्यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.हा कथित घोटाळा केवळ आर्थिक स्वरूपाचा नसून, प्रशासन, न्यायप्रक्रिया आणि शासनाच्या विश्वासावर झालेला गंभीर आघात असल्याचे तज्ज्ञांचे मत असून, संपूर्ण प्रकरणाची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करून दोषींवर कठोर कारवाई करण्याची जोरदार मागणी होत आहे.

### जिल्हाधिकारी साहेब दाखवा हिंमत चौकशी करून गुन्हे दाखल करा

विवेक जॉन्सन हे शिस्तप्रिय जिल्हाधिकारी म्हणून ओळखले जातात. जर त्यांना भूसंपादन प्रक्रियेत खरोखरच पारदर्शकता प्रस्थापित करायची असेल, तर त्यांनी सन २०२१२२ मध्ये अप्पर जिल्हाधिकारी तुषार ठोंबरे यांनी सादर केलेला चौकशी अहवाल तात्काळ ताब्यात घेऊन त्याआधारे सखोल चौकशी करणे अत्यावश्यक आहे.

या चौकशी अहवालाच्या अनुषंगाने तत्कालीन जिल्हाधिकारी राधाबिनोद शर्मा यांच्या निदर्शनास मागील तारखांनी स्वाक्षऱ्या करण्यात आल्याचा गंभीर प्रकार आणून देण्यात आला होता. त्याच टप्प्यावर जर तत्कालीन अधिकाऱ्यावर कायदेशीर कारवाई करून गुन्हे दाखल करण्यात आले असते, तर पुढील काळात हा संपूर्ण गैरप्रकार घडण्याची शक्यताच उरली नसती.

अजय सरवदे,जिल्हाध्यक्ष, वंचित बहुजन आघाडी बीड (पश्चिम)

## तिरूमला कंपनीचे इलेक्ट्रिक पंप चोरणाऱ्या पाच आरोपींना अटक

बीड । प्रतिनिधी

दिनांक ३ डिसेंबर रोजी फिर्यादी दत्ता गंगाधर जगदाळे वय ४३ वर्षे व्यवसाय शेती रा. साखरे बोरगांव यांनी फिर्याद दिली की, दि. २ ते दिनांक ३ डिसेंबर रोजीचे ०९.३० ते १०.०० वाजता . नवीन मोढा बीड परीसरातील तिरुमला हेअर ऑईल कंपनीचे शटर कापुन आत प्रवेश करुन कंपनी मधील ५० क्षमतेच्या इंन्डक्शन कंपनीच्या तीन इलेक्ट्रीक मोटार प्रती किंमती १,५०,०००/- रुपये प्रमाणे एकूण ४,५०,०००/-रुपये व २५-क्षमतेच्या इंन्डक्शन कंपनीच्या दोन इलेक्ट्रीक मोटार प्रती किंमती ७०,०००/- रुपये प्रमाणे एकुण १,४०,०००/- रुपये असा एकुण ५,९०,०००/- रुपयेचा मुद्देमाल अज्ञात चोरट्याने चोरुन नेल्याचे तक्रारी वरुन पोलीस ठाणे पेठ बीड येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हा दाखल होताच पोलीस ठाणे पेठ बीड येथील अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ गुन्हयातील गेला माल व आरोपीचा शोध घेतला असता आवघ्या दोन तासात घरफोडी गुन्ह्यातील आरोपी किशोर भगवान मस्के वय ३६ वर्षे रा.हनुमान नगर पेठ बीड, मयुर गोरख चांदणे वय २१ वर्षे रा. चांदण्याचा वाडा पेठ बीड यांना ताब्यात घेवुन त्यांचे कडुन गुन्ह्यातील गेला माल पैकी दोन इलेक्ट्रीक मोटार किंमती १,४०,०००/- रुपयेच्या जप्त केल्या त्यानंतर गुन्ह्याचा अधिक तपास करुन सदर गुन्हयातील इतर तीन आरोपी अविनाश कल्याण धुरंधरे वय ३५ वर्षे , गोपी ऊर्फ बाळा एकनाथ चांदणे वय ३० वर्षे, , विपुल उत्त्म गायकवाड वय ४० वर्षे सर्व रा. चांदण्याचा वाडा पेठ बीड, यांना अटक करुन त्यांचे कडुन दोन इलेक्ट्रीक मोटार ३,००,०००/- रुपये असा एकुण ४,४०,०००/- रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त केला आहे. सदर गुन्ह्यात सराईत गुन्हेगार नामे भिमा लक्ष्मण मस्के रा. वतारवेस पेठ बीड याचे नाव निष्पंन्न? असुन त्यास अटक करणे बाकी आहे. सदर आरोपीतांचा गुन्ह्यांचा अभिलेखाची पाहणी केली असता आरोपी हे वारंवार संघटीत पणे गुन्हे करण्याचे सवईचे असुन त्यांचेवर मालाविरुध्दचे अनेक गुन्हे दाखल असल्याने त्यांचेवर भारतीय न्याय संहीतीचे नवीन सुधारीत संघटीत गुन्हेगारीचे कलम ११२ प्रमाणे वाढ करण्यात आली आहे.सदरची कारवाई ही पोलिस अधीक्षक नवनीत कॉवत,अपर पोलिस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलिस अधिकारी श्रीमती. पुजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक मारुती खेडकर, सपोनि. नित्यानंद उबाळे, पोउपनि. मन्सुर शहा, पोह/ नितीन राठोड, पोह/सुभाष मोठे, पोह/ अजित शिकेतोड, पोअं/औदुंबर गिरी, पोअं/पांडुरंग परजणे, पोअं/ कल्याण जाधव सर्व नेमणुक पोलीस ठाणे पेठ बीड यांनी केली असुन सदर गुन्ह्याचा पुढील तपास पोउपनि. मन्सुर शहा पोलीस ठाणे पेठ बीड हे करीत आहेत.



पेठ बीड पोलिसांनी केला साडेचार लाखाचा माल जप्त

पान ६ वरुन...

### सुंदरराव सोळंके महाविद्यालयास

कार्यपध्दती आणि अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या माध्यमातून सातत्याने गुणवत्ता वाढीचे उपक्रम राबविले जातात. महाविद्यालयाच्या उल्लेखनीय यशाबद्दल मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आ. प्रकाश सोळंके, सरचिटणीस आ. सतीश चव्हाण यांच्यासह ऍड. बी.आर.डक यांनी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.जी. के.सानप, प्रभारी प्राचार्य डॉ.एन. के.मुळे, उपप्राचार्य डॉ. एम.ए.कव्हळे, अंकेक्षण समितीचे समन्वयक डॉ. अरुण पेंटावार, प्रबंधक प्रशांत चव्हाण यांच्यासह प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

### कार खरेदीचा बहाणा

अब्दुल सादिक वय ४३ वर्षे, राहणार इदगाह गेट, हैदरपूर, अमरावती या दोघांना अटक करण्यात आली आहे. प्राथमिक तपासात सदरील कारचा वापर गोवंश चोरीसाठी करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे. सदरील कार अमरावती ग्रामीण येथील बेनवडा पोलीस स्टेशन हद्दीत जप्त करण्यात आलेली असून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे. या पार्श्वभूमीवर बीड शहर पोलिसांच्या वतीने नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की वाहन विक्री करताना अत्यंत दक्षता घ्यावी. केवळ जास्त किंमत देत आहे म्हणून कोणाच्याही ताब्यात वाहन देऊ नये. मध्यस्थामार्फत व्यवहार केला जात असला तरी समोरच्या व्यक्तीची संपूर्ण खात्री पटल्याशिवाय वाहन सुपूर्द करू नये. संपूर्ण रक्कम प्राप्त होऊन वाहनाची कायदेशीर नोंदणी व हस्तांतरण प्रक्रिया पूर्ण झाल्याशिवाय वाहन विक्री करू नये, अन्यथा सदरील वाहन परत मिळण्याची शक्यता कमी असून ते गुन्हेगारी कृत्यासाठी वापरले जाण्याचा धोका असतो. ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. नवनीत कॉवत, अपर पोलीस अधीक्षक श्री. सचिन पांडकर व उपविभागीय पोलीस अधिकारी श्रीमती पूजा पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक श्री. शीतलकुमार बल्लाळ, पोलीस जमादार बबन जाधव व पोलीस अंमलदार संजय राठोड यांनी केली आहे.

### नविन वर्षाच्या सुरुवातीला

कारवाई मा. पोलीस अधीक्षक श्री नवनीत कावत साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनी मंगेश साळवे, पोलीस हवालदार-रामदास गिरी, पोलीस अंमलदार शिवदास केदार, तुषार मिसळ यांनी केले या उत्कृष्ट कामगिरीमुळे अंभोरा पोलिस ठाण्याचे सपोनि मंगेश साळवे व संपुर्ण स्टाफचे पंचक्रोशीतुन कौतुक होत आहे.

### जायकवाडी वसाहतीवर

मात्र या ठिकाणी ज्यांना राहण्यासाठी घरे देण्यात आली होती. त्यांच्या ऐवजी आता या इमारतींमध्ये इतर लोक आपल्या कुटुंबासह गेल्या अनेक वर्षांपासून राहत आहेत. या इमारती मोडकळीस आल्या असून, त्या इमारतीमध्ये अतिक्रमण करून काही लोक राहत आहेत. त्यामुळे त्यांनी तात्काळ घरे रिकामी करावीत नसता बुलडोजर फिरवून ही घरे जमीनदोस्त करण्यात येणार असल्याचे पत्रक जायकवाडी सिंचन शाखा क्रमांक ५ चे शाखाधिकारी नागेश एच गट्टूवार यांनी काढले आहे. सध्या इयत्ता दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षा सुरू होण्याचा कालावधी असून कडाक्याची थंडी पडलेली आहे अशावेळी या घरांमधून राहणाऱ्या लोकांना मुलाबाळांसह बाहेर काढून सदर इमारतींवर बुलडोझर फिरवले तर ते कुटुंब रस्त्यावर येतील. आशा ऐनवेळी हे लोक आपल्या कुटुंबासह कोठे रहायला जातील? हा त्यांच्या समोर प्रश्न आहे. शासन व पाटबंधारे विभागाने घेतलेल्या या निर्णयामुळे दहावी व बारावी बोर्ड परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होईल. हा प्रश्न घेऊन गेवराई विधानसभा मतदारसंघातील जायकवाडी वसाहत असलेल्या राक्षसभुवन, धोंडराई, बागपिंपळगाव, तलवाडा, जातेगाव आणि टाकरवन येथील नागरिकांनी भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांची भेट घेऊन त्यांच्यासमोर आपली व्यथा मांडली. पाटबंधारे विभागाने हा निर्णय तात्काळ रद्द करावा किंवा आम्हाला घर रिकामे करण्यासाठी वेळ वाढवून द्यावा नसता आम्ही रस्त्यावर उतरून आंदोलन करू असा इशाराही त्यांनी दिला. याबाबत तात्काळ दखल घेऊन माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी संबंधित विभागाचे कर्मचारी अधिकारी यांच्याशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून १० वी, १२ वी परीक्षेचा विद्यार्थ्यांचा कालावधी आणि थंडीचे दिवस लक्षात घेऊन घर रिकामे करण्यासाठी या नागरिकांना काही दिवस वेळ वाढवून द्यावा अशी मागणी केली आहे. याबाबत आपण राज्याचे मंत्री ना राधाकृष्ण विखे पाटील यांच्याशी भेट घेऊन याबाबत चर्चा करणार असल्याचेही बदामराव पंडित म्हणाले.

### आपली नजर, मन व

धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गायक, वादक, वीणेकरी तसेच शिवभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. संपूर्ण परिसर भक्तिमय वातावरणाने भारावून गेला होता. काल्याच्या कीर्तनानंतर सर्व भाविकांसाठी महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या सप्ताहाच्या यशस्वी आयोजनामुळे मानूर परिसरात आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले असून भाविकांमध्ये समाधान व भक्तिभावाची लहर पसरली आहे. पुरीभाजी व बुंदीचा महाप्रसाद मानूर येथील अखंड शिवनाम सप्ताहाच्या सांगता सोहळ्यानिमित्त भाविकांसाठी पारंपरिक पद्धतीने पुरीभाजी व बुंदीचा महाप्रसाद देण्यात आला. ताज्या व सात्त्विक पदार्थांनी तयार करण्यात आलेल्या या महाप्रसादाचा हजारो भाविकांनी भक्तिभावाने लाभ घेतला. सात दिवसात ५ लाख भाविक मानूर नगरीत मानूर नगरीत गेल्या सात दिवसांपासून अखंड शिवनाम सप्ताह सुरू असून सप्ताहाच्या पहिल्या दिवसापासून शेवटच्या दिवसापर्यंत महाराष्ट्रातील ५ लाख भाविक उपस्थित राहिले असून सप्ताहामुळे भक्तीमय वातावरण निर्माण झाले होते. सप्ताह काळामध्ये नेत्र तपासणी शिबिर तसेच सर्व रोग निदान शिबिर लहान बालकांचे तपासणी शिबिर संपन्न झाले त्याचबरोबर तरुण वर्गाचे विशेष सहकार्य लाभले बीड येथील तरुण भजनी मंडळाची संगीतमय भजन संध्या कार्यक्रमाच्या एक दिवस आधी संध्याकाळी संपन्न झाली.

## उज्वला लटपटे यांना आदर्श जिजाऊ माँ साहेब सन्मान पुरस्कार जाहीर

बीड । प्रतिनिधी

श्रीमती उज्वला लटपटे शैक्षणिक क्षेत्रात लेखणी काम केल्याबद्दल मराठा सेवा संघ प्रणित तानुबबिरजे पत्रकार संघ परिषद आष्टी यांच्यावतीने दरवर्षी विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना आदर्श जिजाऊ माँ साहेब पुरस्कार देऊन गौरविण्यात यावर्षीचा पुरस्कार उज्वला सोनाजी लटपटे जिल्हा परिषद मांडवा सहशिक्षिका मराठा सेवा संघ प्रणित कानबाई बिरजे पत्रा संघ परिषदेचे अध्यक्ष सिताराम पोकळे यांनी श्रीमती उज्वला लटपटे यांच्या नावाची पुरस्काराची घोषणा नुकतीच केली असून लवकरच मान्यवर हस्ते वितरण करण्यात येणार आहे असे निवड समिती कळविले आहे क्रांती व ज्योती सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका स्वामी विवेकानंद शिक्षक पतसंस्थेचा आदर्श पुरस्कार राज्यस्तरीय क्रांतीज्योती सावित्री पुरस्कार २०२३ त्याचबरोबर महिला मेळाव्याचे आयोजन शालेय विद्यार्थी गुणवत्ता विकास विविध शासकीय योजनेचे अंमलबजावणी माझी शाळा सुंदर शाळा चार वर्षे विज्ञानाचे प्रदूषण मध्ये सहभाग मीना राजू यांच्या माध्यमातून उपक्रम गणित प्रदूषणात सहभाग जागतिक महिला दिन शिक्षण वारी यासारखे उपकरणात सहभाग



प्लस पोलिओ वृक्षारोपण जनगणना यासारख्या राष्ट्रीय कार्यात सहभाग घेऊन आजपर्यंत असे विविध संस्थेचे पुरस्कार मिळाले असून त्यांच्या त्यांना मिळाल्याबद्दल आष्टी तालुक्यातील गटशिक्षणाधिकारी श्रीमती सीमा काळे बेलगाव केंद्राचे मुख्याध्यापक रघुनाथ खंडागळे शशिकांत खंडागळे शहाजी तोत्रे प्रल्हाद खाडे राजेंद्र बडे मंगल झगडे विस्ताराधिकारी सुनिता उगले आशा शिंदे उर्मिला फुदे सुजाता जाधव सुजाता पवार जयश्री सोळसे गीता शेकडे जगन्नाथ सोनवणे मिना थोरवे मिनाक्षी धोंडे नेमाजी अशोक लटपटे संतोष दाणी विकास तात्या साळवे सारुक शेख आदिंसह केंद्रातील सर्व शिक्षक बधु भगिनी अभिनंदन शुभेच्छा दिल्या

## मोफत नाडी परीक्षण शिबिरास नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

पाटोदा । प्रतिनिधी

आय बी न्यूजच्या वतीने पाटोदा शहरात आयोजित करण्यात आलेल्या मोफत नाडी परीक्षण शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त आणि उल्लेखनीय प्रतिसाद लाभला. या शिबिराचे आयोजन पत्रकार इद्रिस चाऊस यांच्या पुढाकाराने करण्यात आले होते.

या आरोग्य शिबिरामध्ये कल्याण लाईफ केअर (आयुर्वेदिक औषधी उत्पादक) कंपनीचे डॉ. अब्दुल रज्जाक, महाराष्ट्र मार्केटिंग प्रमुख अमोल उमाटे, नवनाथ बनकर यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच नाडी तज्ञ डॉ. गोविंद कामटे आणि डॉ. कृष्णा खरवडे यांनी रुग्णांचे सखोल नाडी परीक्षण करून विविध आजारांवर अचूक निदान केले.

शिबिरामध्ये मोठ्या संख्येने रुग्णांनी सहभाग नोंदवला. अनेक दीर्घकालीन आजारांबाबत नाडी परीक्षणाच्या माध्यमातून योग्य निदान करून रुग्णांना आवश्यक आयुर्वेदिक औषधे मोफत देण्यात आली. शिबिरातील सेवा, मार्गदर्शन व उपचार पद्धतीबाबत उपस्थित नागरिकांनी समाधान व्यक्त केले.

या उपक्रमामुळे आयुर्वेदिक उपचार पद्धतीबाबत जनजागृती होऊन नागरिकांना आरोग्यविषयक योग्य दिशा मिळाल्याचे मत उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केले. अशा प्रकारचे आरोग्य शिबिर भविष्यातही आयोजित करण्यात यावीत, अशी मागणी नागरिकांकडून करण्यात आली. संपादक इद्रीस चाऊस आय बी न्यूज पाटोदा

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड- ४३१ १२२**
**दिनांक १३ नाव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / १८४१**

### जाहिर प्रगटन

CONSUMER CASE NO. DC/470/CC/344/2025
VIMAL SADASHIV DARADE
Versus
SHRI SAIRAM URBAN MULTISTATE CO OP CREDIT CO.LTD

To,

**Opposite Party / Respondent Name:**

1. SHRI SAIRAM URBAN MULTISTATE CO OP CREDIT CO. LTD. HEAD OFFICE, PARBHANE ESTATE, KOTWAL GALLI, SUBHASH ROAD, BEED TQ AND DIST. BEED. 431122, MAHARASHTRA BEED-431122
2. PRESIDENT/CHAIRMAN SADHANA SHAHINATH PARBHANE HEAD OFFICE PARBHANE ESTATE KOTWAL GALLI, SUBHASH ROAD, BEED TQ DIST. BEED., MAHARASHTRA BEED-431122
3. SACHID SHAHINATH. VIKRAMRAO PARBHANE HEAD OFFICE PARBHANE ESTATE KOTWAL GALLI, SUBHASH ROAD, BEED TQ DIST. BEED., MAHARASHTRA BEED-431122
4. BRANCH MANAGER SAIRAM URBAN MULTISTATE CO OP CREDIT CO. LTD. BRANCH SHIVAJI NAGAR, BEED TALUKA BEED DIST. BEED, MAHARASHTRA BEED-431122

**जाहिर प्रगटन**

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वत: अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार. १२/११/२०२५ दिनांक

ठिकाण - बीड

स्वाक्षरीत
**प्रवंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड.

## संविधान हिच जीवन जगण्याची उत्तम पद्धती - उमेश मोगरेकर

माजलगाव । प्रतिनिधी

भारतीय संविधानाच्या अमृत महोत्सवानिमित्त महाराष्ट्र राज्य कास्ट्राईब कर्मचारी कल्याण महासंघातर्फे डॉ.बाबासाहेब आंबेडकर अभ्यासिका येथे लाऊड स्पीकर वरून भारतीय संविधान वाचन पंधरवाडा व कवि संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते.या उपक्रमाचे उद्धाटन दिनांक १५ डिसेंबर रोजी मा.राहुल सूर्यतळ पोलीस निरीक्षक यांच्या हस्ते संपन्न झाले.

दिनांक १६ डिसेंबर ते २८ डिसेंबर या कालावधीत विविध क्षेत्रांतील मान्यवरांनी भारतीय संविधानाचे सामूहिक वाचन केले. यामध्ये ॲड.आरती गाडेकर,ॲड.सीमा उजगरे,बाळासाहेब सोनसळे ॲड.दत्ता जाधव,गोविंद गोचडे,सुरेखा गवळी,प्रा.डॉ.बालाजी बोडखे,नामदेव पाचपुते,नंदकुमार हवरगावकर,शेख इफ्तेखार,सखाराम जोशी,प्रा.संजय बागुल,दुर्गा राऊत व आसाराम ढगे या मान्यवर वाचकांनी सहभाग नोंदवून संविधानातील लोकशाही,स्वातंत्र्य,समता, बंधुता व सामाजिक न्याय या मूलभूत मूल्यांचा आशय भारतीय संविधानावर आधारित मा.नूरखा पठाण लिखित आपले संविधान राज्य पद्धती नव्हे तर जीवन पद्धती या पुस्तकातील अनुच्छेद १ते ५१ चे वाचन उपस्थितांसमोर तसेच लाऊड स्पीकर द्वारे ऐकणाऱ्यांना प्रभावीपणे मांडला.या वाचन उपक्रमातून सर्वसामान्य नागरिकांमध्ये संविधानाविषयी जागृती निर्माण झाली.

या अमृत महोत्सवानिमित्त आयोजित वाचन उपक्रमाची सांगता दिनांक २९ डिसेंबर रोजी संविधान मूल्यांवर आधारित कवि संमेलनाने करण्यात आली.कवि संमेलनात उद्धाटनपर




मनोगतात ज्येष्ठ पत्रकार उमेशकाका मोगरेकर यांनी भारतीय संविधान संबंध विश्वात मौल्यवान असून,लोकशाही टिकवून ठेवण्यासाठी त्याचे वाचन करणे अत्यंत आवश्यक असून तीच खऱ्या अर्थाने जीवन जगण्याची उत्तम पद्धती आहे असे सांगितले.या कवी संमेलनाच्या अध्यक्षस्थानी प्रख्यात कवी प्रभाकर साळेगावकर हे होते.त्यांनी या उपक्रमामुळे संविधानाचे महत्त्व अधोरेखित होऊन नागरिकांमध्ये संविधानप्रती आदर,निष्ठा व जबाबदारीची भावना अधिक दृढ होईल असे सांगितले.प्रमुख उपस्थितीमध्ये माजी न्यायाधीश मिलिंद डोंगरे यांनीही न्यायालयीन व्यवस्थेमधील अनेक उदाहरणांचा दाखला देऊन संविधानाचे महत्त्व प्रतिपादित केले.तर प्रमुख पाहुण्यांमध्ये श्रीमंत डोंगरे,लक्ष्मण मस्के,लक्ष्मण बनसोडे,कमलताई डोंगरे,प्रा.धम्मानंद बोराडे,आनंद सिरसट,अशोक कांबळे हे उपस्थित होते.या कवी संमेलनाचे सूत्रसंचालन ना.मा.पडलवार सर यांनी केले.मोहन राठोड,बालाप्रसाद चव्हाण,भारत टाकणखार,पोशेट्टी लखमावार,वैभव सोळंके,सखाराम जोशी,प्रमोद काळे,मोहन राठोड,प्रवीण काळे, बालाप्रसाद चव्हाण,दीपक पांढरे,शरद रांजवन,गोविंद गोचडे,श्रीम.गौरी देशमुख, डॉ.प्रज्ञा जोशी,लता जोशी,स्मिता लिमगावकर,सारिका बेदरे,दुर्गा राऊत,संगीता जाधव,गौरी देशमुख,प्रतिभा थीगळे,जया मुंडे आदी कवींनी सहभाग घेत संविधानाची भावना व्यक्त करणाऱ्या आशयपूर्ण कविता सादर केल्या. कार्यक्रमाच्या उद्धाटनपर सत्राचे बहारदार संचालन बाबा जाधव यांनी केले तर कार्यक्रमाचे प्रस्ताविक महासंघाचे तालुकाध्यक्ष राहुल टाकणखार यांनी केले.आभार अभिमन्यू इबिते यांनी मांडले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी महासंघाचे पदाधिकारी राजकुमार सोनवणे,वसंत टाकणखार,निलेश गावडे,हनुमंत पांढरपोटे,नारायण भाळशंकर,शिवाजी भाळशंकर,अमोल राऊत,राहुल खुणे,प्रवीण जाधव राजेंद्र,सातपुते,सतीश डोणे,नितीन पुटवाड,किरण शिंदे,अजीमोद्दीन खतीब,अतुल चाळक,जमीर शेख,पठाण कासिम आदींनी परिश्रम घेतले.

# विदर्भात थंडीचा कडाका वाढला

## मध्य महाराष्ट्र, मराठवाड्यातील तापमानात चढ उतार

विदर्भात थंडीचा कडाका काहीसा वाढला आहे. उत्तर महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील तापमानात काहीसे चढ उतार कायम आहेत. पुढील काही दिवस तापमानात चढ उतार राहतील, मात्र थंडीही कायम राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.

विदर्भातील अनेक भागात आज किमान तापमानात काहीशी घट दिसून आली. विदर्भातील अनेक ठिकाणी तापमान १० अंशाच्या खाली आले होते. गोंदीया येथे निफाड एवढे म्हणजेच ८.२ अंश सेल्सिअस तापमान होते.

तर नागपूर येथे ८.५ आणि अमरावती येथे ८.७ अंशाची नोंद झाली होती. वर्धा येथेही ९.६ अंश तापमान होते. तर विर्भातील बहुतांशी ठिकाणी तापमान १० ते १२ अंशाच्या दरम्यान होते. यामुळे विदर्भात थंडीचा कडाका काहीसा अधिक होता.

मध्य महाराष्ट्र आणि मराठवाडा तसेच कोकणातील तापमानात काहीशी वाढ दिसून आली. अहिल्यानगर येथे आज तापमानात वाढ होऊन ९.४ अंशाची नोंद झाली. जेऊर येथे ८.५ तर मोहोळ येथे ८.८ अंश सेल्सिअस तापमान होते. इतर भागातील किमान तापमानात वाढ दिसून आली. सोलापूर येथे राज्यातील उचांकी ३१.७ अंश सेल्सिअस कमाल तापमान होते.

उत्तर भारतातील काही भागात थंडीची लाट कायम आहे. तर अनेक ठिकाणी किमान तापमानात चढ उतार दिसत आहेत. उत्तर भारतातून थंड वाऱ्याचे प्रवाह काहीसे कमी झाल्याने राज्यातील थंडीवर परिणाम दिसत आहे. किमान तापमानात काहीसे चढ उतार राहतील मात्र थंडीही राहील, असा अंदाज हवामान विभागाने दिला आहे.



# थंडीमुळे द्राक्ष बागेवर परिणाम अन् भुरी रोग



द्राक्ष वेलीवरील परिणाम अतिथंडीमुळे मुळांची वाढ मर्यादित होते, त्यामुळे पाने लहान व पातळ राहतात. शेंड्यांची वाढ थांबते आणि कॅनोपी कमकुवत होते. पोटॅश, कॅल्शिअम व फॉस्फरस यांचे शोषण कमी होते, परिणामी मण्यांवर विकृती दिसून येतात. थंडी जास्त असल्यास रोग व किडींचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता असते.

रोग नियंत्रण : कमी तापमानामध्ये प्रामुख्याने भुरी रोगाचा प्रादुर्भाव दिसून येतो. दाट कॅनॉपी असलेल्या वेलीवर भुरीचा प्रादुर्भाव जास्त प्रमाणात दिसेल. बऱ्याच ठिकाणी पानाच्या मागे दडलेला द्राक्षघड पूर्णपणे भुरी रोगाने ग्रस्त झालेला दिसून येईल. या वेळी द्राक्षबागेत ५० दिवसांनंतर वाढीच्या अवस्थेत आंतरप्रवाही बुरशीनाशकांची फवारणी करण्याची शिफारस नाही. यावर उपाययोजना म्हणून स्पर्शजन्य बुरशीनाशकांची धुरळणी करता येईल. मोकळी कॅनॉपी असलेल्या बागेत ही समस्या कमी प्रमाणात दिसून येते. कारण या कॅनॉपीमध्ये हवा सतत खेळती राहिल्यामुळे आर्द्रतेचे प्रमाण कमी राहते. त्यामुळे फवारणीचे कव्हरेज चांगले होऊन प्रभावी रोग नियंत्रण होते. म्हणजेच या कॅनॉपीमध्ये रोगास पोषक वातावरण तयार होत नाही. या वेळी जैविक नियंत्रणावर जोर देता येईल. धुके, पानांवर दवबिंदू जास्त काळ टिकून राहिल्यास पाने जास्त काळ ओली राहतात. त्यामुळे आर्द्रतासुद्धा वाढते. या काळात डाऊनी मिल्ड्यूसारख्या रोगाचे बीजाणू सक्रिय होतात.

पाणी उतरत असलेल्या परिस्थितीत सुद्धा याचा प्रादुर्भाव दिसून येईल. अशा वातावरणात भुरी आणि डाऊनी या दोन्ही रोगांचे नियंत्रण गरजेचे असेल. ज्या बागेत पाने जास्त वेळ ओली राहतात, तेथे स्पर्शजन्य बुरशीनाशकांची धुरळणी करणे फायद्याचे असेल.

यामुळे ओल्या पानांवर जास्त वेळ बुरशीनाशक चिकटून राहील व रोग नियंत्रण सोपे होईल. कॅनॉपीत वाढलेल्या आर्द्रतेत पाने जास्त काळ ओली नसलेल्या परिस्थितीत जैविक नियंत्रणासाठी ट्रायकोडर्माच्या तीन-चार फवारण्या करून घेतल्यास प्रभावी रोग नियंत्रण होईल.

# केळीवरील 'काळी बोंडी कूज' रोगाचे नियंत्रण

केळी पिकावरील जळका चिरूट ज्याला आपण काळी बोंडी कूज' म्हणून सुद्धा ओळखतो हा रोग तीन ते चार वर्षांपूर्वी कमी घातक रोग म्हणून ओळखला जायचा. परंतु काही काळापासून हा एक महत्त्वाचा रोग म्हणून उदयास येत आहे ज्याचे मुख्य कारण म्हणजे वातावरणातील अति आर्द्रता. सिगार एंड रॉट हा केळीच्या फळांचा प्रमुख रोग आहे. हा रोग प्रामुख्याने ट्रॅचिस्फेरा फ्रुक्टिजेना या बुरशीमुळे होतो आणि काही वेळा व्हर्टिसिलियम थियोब्रोमामुळे देखील होतो.रोगाचा प्रसार : हा रोग वारा किंवा पावसामुळे पसरतो. पावसाळ्यात केळीच्या फुलांच्या अवस्थेत निरोगी उतींवर बुरशीचा हल्ला होतो. ते फुला द्वारे केळीला संक्रमित करते. तेथून पुढे ते फळांच्या टोकापर्यंत पसरते आणि कोरड्या कुजेला कारणीभूत ठरते जे राखेसारखे दिसते आणि सिगारसारखे दिसते, ज्यामुळे रोगाला सिगार अॅन्ड रॉट असे नाव दिले जाते. स्टोरेजमध्ये किंवा वाहतुकी दरम्यान या रोगाचा प्रसार संपूर्ण फळांवर होतो रोगाची लक्षणे : हा रोग फळांच्या टोकांवर येत असून टोके कोरड्या, तपकिरी ते काळी कुजल्यासारखी दिसतात. बुरशीची वाढ प्रत्यक्षात फुलांच्या अवस्थेपासून सुरू होते आणि फळांच्या परिपक्वतापूर्वी किंवा त्यापूर्वी दिसून येते. प्रभावित भाग तपकिरी बुरशीच्या वाढीने झाकले जातात. जे स्कॅबच्या जळलेल्या टोकावर राखेसारखे दिसतात. फळांचा आकार असामान्य दिसतो, त्यांच्या



पृष्ठभागावर साचा दिसून येतो आणि त्वचेवर जखम स्पष्टपणे दिसतात.

रोगाचे जैविक नियंत्रण : या रोगास कारणीभूत असलेल्या बुरशीच्या नियंत्रणासाठी बेकिंग सोडावर आधारित फवारणी केली जाऊ शकते. ही फवारणी करण्यासाठी, ५० ग्रॅम बेकिंग सोडा पाण्यात विरघळवून २५ मिली द्रव साबण प्रति लिटर पाण्यात मिसळून द्रावण तयार केले जाते. संसर्ग टाळण्यासाठी, हे मिश्रण संक्रमित फांद्या आणि जवळच्या फांद्यावर फवारावे. हे केळीच्या बोटांच्या पृष्ठभागाची पीएच पातळी वाढवते आणि बुरशीच्या वाढीस प्रतिबंध करते.रासायनिक नियंत्रण : शक्य असल्यास जैविक उपचारासह प्रतिबंधात्मक उपायांसह एकात्मिक दृष्टिकोनाचा नेहमी विचार करा. हा रोग सहसा किरकोळ महत्त्वाचा असतो आणि क्वचितच रासायनिक नियंत्रणाची आवश्यकता असते.

मात्र गेल्या तीन वर्षात या आजाराच्या तीव्रतेत मोठ्या प्रमाणात वाढ झाली आहे कारण अतिवृष्टीमुळे वातावरणात भरपूर ओलावा निर्माण झाला आहे, जो या आजाराच्या प्रसारासाठी महत्त्वाचा आहे. त्यामुळे रासायनिक नियंत्रणासाठी केळीच्या बाधित घडावर एकदा मॅन्कोझेब, ट्रायओफेनेट मिथाइल किंवा मेटालॅक्सिल १ ग्रॅम प्रति लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी आणि नंतर प्लास्टिकने झाकून टाकावे. कॉपर ऑक्सिक्लोराईड स्प्रे सारखी कॉपर बुरशीनाशके देखील प्रभावी ठरू शकतात. परंतु फवारणीच्या १० दिवसांनंतरच फळांची काढणी करावी.

# तेलघाणीतील पेंडीपासून खाद्यपदार्थांची निर्मिती

अकोला जिल्ह्यात सिसा (उदेगाव) येथे कृषी विज्ञान केंद्र (केव्हीके) कार्यरत आहे. केंद्रातर्फे विविध उपक्रम राबविले जातात. त्यापैकी अलीकडील काळातील सर्वात महत्त्वाचा उपक्रम म्हणजे घाण्यावर खाद्यतेलनिर्मिती. मात्र तेवढ्यापुरते न थांबता केव्हीकेने तेलनिर्मितीनंतर तयार होणाऱ्या उपउत्पादनापासून म्हणजे पेंडीचे (डी ऑइल्ड केक) मूल्यवर्धन करण्याचे ठरविले. आज समाजात आरोग्यविषयक जागरूकता कमालीची वाढली आहे. दैनंदिन आहार पद्धती, आरोग्यवर्धक तेलांचा वापर याबाबत ग्राहक जागरूक झाला आहे. केव्हीकेने हीच संधी ओळखून त्यानुसार या मूल्यवर्धनाचे उद्योगात रूपांतर करण्याच्या दृष्टीने पावले टाकली आहेत.

प्रकल्पातून मिळाली मूल्यवर्धनाची दिशा या केव्हीकेकडे सन २०२०- २१ मध्ये एक प्रकल्प येऊ घातला. इलेक्ट्रॉनिक आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय व सी-डॅक कोलकत्ता यांच्यातर्फे संयुक्तपणे चालवल्या जाणाऱ्या या प्रकल्पाचे 'शुद्धता' असे नाव होते. शेंगदाणासारख्या तेलातील भेसळ निश्चित करण्यासाठी ई-नाक आणि ई-जीभ या इलेक्ट्रॉनिक तंत्रज्ञानावर हा प्रकल्प होता. त्यात केव्हीकेकडे नमुना पृथ्थकरणाचे काम होते. त्याचबरोबर तेलनिर्मितीत तयार होणाऱ्या पेंडीचे अर्थात 'डी ऑइल्ड केक' चे मूल्यवर्धन करण्याची दिशा केंद्राला मिळाली. त्यातून केव्हीकेच्या गृहविज्ञान शाखेच्या विषय विशेषज्ज्ञ कीर्ती देशमुख यांनी पुढाकार घेतला. त्यांना केंद्राचे प्रमुख व वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. उमेश ठाकरे यांचे मार्गदर्शन मिळाले. पेंडींपासून विविध खाद्यपदार्थांचे प्रयोग व रेसिपी तयार होऊ लागली.



विविध पदार्थांची निर्मिती : आज या पेंडीपासून विविध पदार्थ तयार करण्यास केव्हीकेला यश आले आहे. तेलांमध्ये शेंगदाणा, तीळ, नारळ, बदाम आदींचा समावेश आहे. शेंगदाणा तेलाचे वार्षिक उत्पादन तीनहजार लिटर असून त्याचा दर २९० रुपये प्रतिलिटर आहे. बदाम तेलाचा दर लिटरला २५०० रुपये आहे. पेंडीचा समावेश करून 'मिक्स चटणी', खोबऱ्याची तसेच तिळाची चटणी तयार केली आहे. त्याचे दर किलोला ३०० ते ४०० रुपयांच्या दरम्यान आहेत. तेले, चटणी, व विविध ढेपा यांच्या विक्रीतून केव्हीकेने १२ लाख ९५ हजार रुपयांचे उत्पन्न मिळवले आहे. खर्च वजा जाता सुमारे पाच लाख रुपयांचा नफा मिळवला आहे. तेल उत्पादन वाढविल्यास व उपलब्ध यंत्रसामग्रीच्या क्षमतेनुसार पूर्ण वापर केल्यास निव्वळ नफ्यात अजून काही पटीने वाढ शक्य आहे.

कच्चामालाचा वापर : उद्योगासाठी शेंगदाणा, नारळ, तीळ, बदाम आदी कच्चा माल अकोला येथील घाऊक बाजारपेठेतून आणला जातो. शेंगदाण्याचे एक लिटर तेल काढण्यासाठी अडीच किलो शेंगदाणा वापरला जातो. शेंगदाण्यामध्ये ४० टक्के, तिळात ४० ते ४३ टक्के, नारळामध्ये ५५ ते ५८ टक्के, बदामात ४० ते ४५ टक्के तेलाचे प्रमाण आहे.

केक, शंकरपाळे आदींचेही उत्पादन : याशिवाय शंकरपाळे, तीळ व शेंगदाणा चिक्की, टॉफी, कप केक, चॉकलेट बॉल, कुकीज आदी पदार्थांची निर्मिती देखील केली आहे. हे पदार्थ तयार करताना त्यातील घटकांचा केलेला समावेश प्रातिनिधीक स्वरूपात पुढीलप्रमाणे. शंकरपाळे - मैदा ७० ग्रॅम, शेंगदाणा ढेप ३० ग्रॅम, पोहे ५० ग्रॅम, मसाला १६ ग्रॅम, तेल ४००मिलि. तीळ चिक्की- तीळ ३१.५ ग्रॅम,, शेंगदाणा ढेप १३.५ ग्रॅम, गूळ ४५ ग्रॅम, तूप ५ ग्रॅम, मध ५ मिलि) टॉफी- शेंगदाणा ढेप पावडर ३० ग्रॅम, आल्याचा रस ५ मिली, मीठ २ ग्रॅम, मध ३० ग्रॅम कप केक- मैदा १९.२५ ग्रॅम, शेंगदाणा ढेप ८.२५ ग्रॅम, साखर ३० ग्रॅम

उत्पादनांचे 'प्रमोशन' : सर्व उत्पादनांसाठी संपदा हा ब्रॅण्डनेम तयार करण्यात ला आहे. त्यासाठी पेट बॉटल तसेच उत्पादननिहाय अर्धा, एक, पाच लिटर, शंभर ग्रॅम असे वजनी पॅकिंग निवडण्यात आले आहे. डॉ, पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, बीज प्रमाणीकरण विभाग, आकाशवाणीसह अन्य शासकीय कार्यालयात काम करणारे अधिकारी, कर्मचारी ही उत्पादने नियमित वापरत आहेत. कृषी विभागामार्फत आयोजित प्रदर्शनांमधूनही त्यांची विक्री होते. दर महिन्याला ग्राहकांची संख्या वाढत चालली आहे. या उत्पादनांसाठी 'फूड सेफ्टी' विषयक केंद्रीय संस्थेचे प्रमाणपत्र घेतले आहे. वजने व मापे प्रमाणित केली आहेत.

उद्योग बनला प्रशिक्षणाचे केंद्र : केव्हीकेचा तेलघाणी उद्योग खरे तर उत्पादनांसह आता विविध योजनांमधील लाभार्थ्यांसाठी प्रात्यक्षिकाचेही स्थळही ठरला आहे. या ठिकाणी पंतप्रधान सूक्ष्म अन्न प्रक्रिया योजनेंतगत तीन दिवसीय प्रशिक्षण वर्ग घेतले जातात.

त्यामध्ये शेतकऱ्यांना तेल प्रक्रियेवर प्रात्यक्षिक देण्यात येते. येथे प्रशिक्षण घेतल्यानंतर अकोट, राजंदा, एरंडा, अकोला, बार्शीटाकळी येथील काही जणांनी तेल प्रक्रिया उद्योग सुरु देखील केला आहे.

## दिन विशेष

### जागतिक दिवस:
### नववर्ष दिन
### जागतिक शांतता दिन
### जागतिक कौटुंबिक दिवस

### महत्वाच्या घटना

१७५६ : निकोबार बेटे डेन्मार्कच्या ताब्यात गेली आणि त्यांना 'न्यू डेन्मार्क' असे नाव देण्यात आले.
१७८५ : डेली यूनिवर्सल रजिस्टर म्हणजेच टाईम्स ऑफ लंडन ने आजच्या दिवशी पहिला अंक प्रकाशित केला होता.
१८०८ : यू. एस. ए. मध्ये गुलामांच्या आयातीस बंदी घालण्यात आली.
१८१८ : भीमा कोरेगाव येथे एफ. एफ. स्टाँटन यांच्या नेतृत्वाखाली फक्त ५०० सैनिक असलेल्या दुसऱ्या बॉम्बे नेटिव्ह इन्फंट्री बटालियनने पेशव्यांच्या २५,००० सैन्याचा पराभव केला.
१८४२ : बाबा पद्मनजी यांचे 'ज्ञानोदय' वृत्तपत्र सुरू झाले. नव्वद वर्षांनंतर याच दिवशी डॉ. ना. भि. परूळेकर यांनी 'सकाळ' वृत्तपत्र हे सुरू केले.
१८४८ : महात्मा फुले यांनी पुणे येथे पहिली मुलींची शाळा सुरू केली.
१८६२ : इंडियन पीनल कोड अस्तित्वात आले.
१८८० : विष्णूशास्त्री चिपळूणकर, लोकमान्य टिळक, गो. ग. आगरकर आणि माधवराव नामजोशी यांनी पुणे येथे 'न्यू इंग्लिश स्कूल'ची स्थापना केली.
१८८३ : पुणे येथे नूतन मराठी विद्यालयाची स्थापना
१८९९ : क्यूबामधील स्पेनची राजवट संपुष्टात आली.
१९०० : स्वातंत्र्यवीर सावरकर यांनी मित्रमेळ्याची स्थापना केली.
१९०८ : 'संगीतसूर्य' केशवराव भोसले यांनी हुबळी येथे 'ललित कलादर्श' ही नाटक कंपनी स्वबळावर स्थापन केली.
१९१२ : याच दिवशी रिपब्लिक ऑफ चायना ची स्थापना झाली होती.
१९१५ : लामहात्मा गांधीयांना केसर ये हिंद चा पुरस्कार व्हायसरॉय यांच्या हातून मिळाला.
१९१९ : गव्हर्नमेंट ऑफ इंडिया अॅक्ट अमलात आला व देशात कायदेमंडळे स्थापन झाली.
१९२० : शंकरराव वासुदेव किर्लोस्कर यांनी छापखान्याची स्थापना केली. त्यातुनच किर्लोस्कर, स्त्री व मनोहर या मासिकांचे संपादन सुरू केले. 'शंवाकिय' हे त्यांचे आत्मकथन हा उत्कृष्ट आत्मचरित्राचा नमुना आहे.
१९२३ : ला चित्तरंजन दास आणिजवाहरलाल नेहरूयांनी स्वराज पक्षाची स्थापना केली.
१९३२ : डॉ. ना. भि. परूळेकर यांनी 'सकाळ' वृत्तपत्र हे सुरू केले.
१९६४ : छत्रपती शिवाजी महाराजयांनी सुरत अभियानाला सुरुवात केली.
१९७२ : वाघाला राष्ट्रीय प्राणी म्हणून निवडल्या गेले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१६६२ : बाळाजी विश्वनाथ भट तथा पहिला पेशवा (मृत्यू: १२ एप्रिल १७२०)
१८७९ : इ. एम. फोर्स्टर ब्रिटिश साहित्यिक (मृत्यू: ७ जून १९७०)
१८९२ : महादेव देसाई स्वातंत्र्य लढ्यातील नेते आणि महात्मा गांधींचे स्वीय सहाय्यक (मृत्यू: १५ ऑगस्ट १९४२)
१८९४ : सत्येंद्रनाथ बोस भारतीय भौतिकशास्त्रज्ञ (मृत्यू: ४ फेब्रुवारी १९७४)
१९०० : श्रीकृष्ण नारायण रातंजनकर आग्रा घराण्याचे गायक, शास्त्रीय संगीताचे गाढे अभ्यासक व संगीत गुरू (मृत्यू: १४ फेब्रुवारी १९७४)
१९०२ : कमलाकांत वामन केळकर भारतातील भूविज्ञान अध्ययनाचा पाया घालणारे वैज्ञानिक (मृत्यू: ६ डिसेंबर १९७१)
१९१८ : शांताबाई दाणी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या अनुयायी (मृत्यू: ९ ऑगस्ट २००२)
१९२३ : उमा देवी खत्री उर्फ 'टुन टुन' अभिनेत्री व गायिका (मृत्यू: २४ नोव्हेंबर २००३)
१९२८ : डॉ. मधुकर आष्टीकर लेखक, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष (मृत्यू: २२ मे १९९८)
१९३५ : ला भारतीय अभिनेत्री शकीला यांचा जन्म.
१९३६ : राजा राजवाडे साहित्यिक (मृत्यू: २१ जुलै १९९७)
१९४१ : गोवर्धन असरानी ऊर्फ 'असरानी' चित्रपट कलाकार
१९४३ : रघुनाथ माशेलकर शास्त्रज्ञ, वैज्ञानिक आणि औद्योगिक संशोधन परिषदेचे महासंचालक, पद्मश्री, पद्मभूषण
१९५० : दीपा मेहता भारतीय वंशाच्या कॅनेडियन दिग्दर्शिका आणि पटकथालेखिका
१९५१ : नाना पाटेकर अभिनेता
१९५३ : भारताचे माजी विदेश मंत्री सलमान खुर्शीद यांचा जन्म.
१९६१ : मणिपूर चे माजी मुख्यमंत्री एन.बीरेन सिंह यांचा जन्म.
१९७१ : संसद चे माजी सदस्य ज्योतिरादित्य सिंधिया यांचा जन्म.
१९७५ : चित्रपट सृष्टीची अभिनेत्री सोनाली बेंद्रे यांचा जन्म.
१९७९ : चित्रपट सृष्टीची अभिनेत्री विद्या बालन यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५१५ : लुई (बारावा) फ्रान्सचा राजा (जन्म: २७ जून १४६२)
१७४८ : योहान बर्नोली स्विस गणितज्ञ (जन्म: २७ जुलै १६६७)
१८९४ : हेन्रिच हर्ट्झ जर्मन भौतिकशास्त्रज्ञ (जन्म: २२ फेब्रुवारी १८५७)
१९४४ : सर एडविन लुटेन्स दिल्लीचे नगररचनाकार (जन्म: २९ मार्च १८६९)
१९५५ : डॉ. शांतिस्वरुप भटनागर वैज्ञानिक (जन्म: २१ फेब्रुवारी १८९४)
१९७५ : शंकरराव वासुदेव किर्लोस्कर उद्योजक, साहित्यिक व चित्रकार. (जन्म: ८ आक्टोबर १८९१)
१९८३ : भारतातील प्रसिद्ध उद्योगपती डी.एन.खुरोदे यांचे निधन.
१९८९ : दिनकर साक्रीकर समाजवादी विचारवंत व पत्रकार
२००८ : ला भारताचे प्रसिद्ध लेखक प्रतापचंद्र चंदर यांचे निधन.
२००९ : रामाश्रेय झा संगीतकार, वादक व शास्त्रीय संगीतातील विद्वान (जन्म: ११ ऑगस्ट १९२८)




राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत
गुरुवार दि.१ जानेवारी २०२६





# भाजपने तिकीट नाकारल्यामुळे महिलेचा राडा

जालना। प्रतिनिधी

भाजपाची उमेदवारी अर्ज दाखल करताना आज शेवटच्या दिवशी संगीता पाचंगे या महिलेला भाजपने तिकीट नाकारल्यामुळे सदरील महिलेने माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यासमोरच राडा केला एकच गोंधळ निर्माण झाला होता या घटनेमुळे कैलास गोरंट्याल घटनेस्थळीवरून काढता पाय घेतला आणि निघून गेली जालना महानगरपालिका निवडणुकीसाठी भाजपकडून उमेदवारी न मिळाल्याने एक महिला इच्छुक उमेदवाराने मनपा कार्यालयाबाहेर रडून संताप व्यक्त करत मोठा आक्रोश केला आहे. या महिला उमेदवाराने सांगितले, ''आम्ही काँग्रेस सोडून भाजपमध्ये आलो, मात्र अपेक्षित उमेदवारी मिळाली नाही,'' असे तिने नमूद केले.या घटनेनंतर जालना महानगरपालिका कार्यालयाबाहेर तणावाचे वातावरण निर्माण झाले. महिला उमेदवार माजी आमदार कैलास गोरंट्याल यांच्यासमोर भावनिक झाली आणि त्यांच्या पायावर डोके ठेवून न्याय मागणी केली. परंतु सदरील महिलेला न्याय दिला नाही तिच्यावर अन्या करण्यात आला या घटनेवरून दिसून येत आहे. घटनेमुळे स्थानिक राजकारणात खळबळ उडाली असून, भाजपच्या उमेदवारीच्या निर्णयावर अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. महिला उमेदवाराच्या या आक्रोशामुळे आगामी निवडणुकीत भाजपमध्ये असलेल्या आंतरिक संघर्षाचे संकेत स्पष्ट होत असून, पक्षाने या प्रकाराकडे गांभीर्याने पाहण्याची गरज आहे, असे समजते. स्थानिक नेत्यांनी या घटनेवर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न केला, परंतु इच्छुक उमेदवाराचा संताप व्यक्त होण्याचा हा प्रकार चर्चेचा विषय बनला आहे. पुढील काळात भाजपच्या उमेदवारी प्रक्रियेत कशा घडामोडी होतात, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# एसटी बसस्थानक स्वच्छतेसाठी दर १५ दिवसांनी विशेष मोहीम

## प्रवाशांच्या सुरक्षित, आरोग्यदायी प्रवासासाठी एसटी महामंडळाचा पुढाकार

मुंबई । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या सर्व बसस्थानकांवर, बसस्थानक परिसरात तसेच प्रशासकीय इमारतींमध्ये दर १५ दिवसांनी सर्वंकष स्वच्छता मोहीम राबविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. प्रवाशांना अधिक स्वच्छ, सुरक्षित व आरोग्यदायी सुविधा मिळाव्यात तसेच एसटीची सकारात्मक प्रतिमा अधिक बळकट व्हावी, या उद्देशाने हा महत्त्वपूर्ण उपक्रम सुरू करण्यात येत आहे.

या मोहिमेंतर्गत बसस्थानकातील बैठक व्यवस्था, फरशी, भिंती, काच, शौचालये, पिण्याच्या पाण्याची ठिकाणे, महिला विश्रांतीगृहे, कार्यालयीन कक्ष आदींची सखोल स्वच्छता करण्यात येणार आहे. साचलेला कचरा, अनावश्यक झाडे-झुडपे, जाहिरातींचे फलक, जाळी-जळमट यांचे निर्मूलन करून परिसर अधिक स्वच्छ, सुंदर व नीटनेटका केला जाणार आहे. कचरा व्यवस्थापनासाठी स्वतंत्र डबे उपलब्ध करून कचऱ्याचे योग्य प्रकारे वर्गीकरण व विल्हेवाट लावली जाणार असून प्रवासी व कर्मचाऱ्यांच्या आरोग्याची विशेष काळजी घेण्यात येणार आहे. पिण्याच्या पाण्याच्या ठिकाणी स्वच्छता व नियमित देखभाल ठेवण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत. या अभियानासाठी स्थानिक स्वराज्य संस्था, सामाजिक संस्था, विद्यार्थी, नागरिक तसेच एसटीचे अधिकारी व कर्मचारी यांच्या सहभागातून ही मोहीम अधिक प्रभावीपणे राबविण्यात येणार आहे. प्रत्येक बसस्थानकावर या मोहिमेची अंमलबजावणी काटेकोरपणे होईल, याची जबाबदारी संबंधित विभागप्रमुखांवर सोपविण्यात आली आहे. दर १५ दिवसांनी होणाऱ्या या स्वच्छता मोहिमेमुळे एसटी बसस्थानके अधिक स्वच्छ, आरोग्यदायी व प्रवाशांसाठी आनंददायी ठरणार असून प्रवासी सेवेमध्ये गुणवत्तावाढ होण्यास मदत होणार आहे. या निर्णयामुळे प्रवाशांचा विश्वास अधिक दृढ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

# बालविवाह मुक्तकरण्यासाठी पोर्टलचा लाभ घ्या-जिल्हाधिकारी



जालना । प्रतिनिधी

शासनाकडून बालविवाह मुक्त भारत पोर्टल सुरु करण्यात आले असून हे सर्व नागरिकांसाठी खुले आहे. तरी बालविवाह मुक्त भारत पोर्टलवर जाऊन या लिंकवर क्लिक करुन बालविवाह निर्मुलनाची प्रतिज्ञा घ्यावी व प्रतिज्ञा घेतल्याचे प्रमाणपत्र प्राप्त करुन या मोहिमेमध्ये नागरिकांनी सहभाग नोंदवावा, असे आवाहन जिल्हाधिकारी आशिमा मित्तल आणि मुख्य कार्यकारी अधिकारी मिन्नु पी.एम. यांनी केले आहे.

जिल्ह्यात दि.१६ ऑक्टोबर २०२५ ते दि.२६ जानेवारी २०२६ या कालावधीमध्ये बालविवाह मुक्त भारत अभियान १०० दिवस जिल्हा महिला व बाल विकास विभागाकडुन राबविण्यात येत आहे. या अभियानांतर्गत जालना जिल्ह्यात बालविवाहाचे समुळ उच्चाटन व्हावे या अनुषंगाने प्रशासनाकडुन जनजागृती करण्यात येत आहे. बालविवाह थांबविण्याकरीता २४ तास १०९८ ही चाईल्ड हेल्पलाईन सेवा सुरु आहे. तसेच प्रशासनासोबतच प्रत्येक नागरिकांनी देखील बालक, बालिका यांचे शारीरिक, मानसिक आरोग्य तसेच बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी बाल विवाह होणार नाही याची दक्षता घेणे गरजेचे आहे. यासाठी सर्व स्तरावरुन सर्वांनी बालविवाह मुक्त भारत करण्यासाठी पुढाकार घेणे गरजेचे आहे. त्याचाच एक भाग म्हणुन बालविवाह मुक्त भारत पोर्टल सुरु करण्यात आले आहे. असे जिल्हा महिला व बाल विकास अधिकारी, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# अहिल्यानगर जिल्ह्यातील गरीब कुटुंबाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून एक लाखाची मदत

## संकेत त सानप यांच्या प्रयत्नांना यश: शासनाची मदत जनतेच्या हाती



अहिल्यानगर/प्रतिनिधी

पला धर्म मानून काम करणाऱ्या मुंबई मंत्रालयातील आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी पुन्हा एकदा जनसेवेचा आदर्श उभा केला आहे. त्यांच्या विशेष पाठपुराव्यामुळे पाडाळणे अकोले तालुक्यातील अहिल्यानगर जिल्ह्यातील अपघातग्रस्त रेखा लांडे या गरजू कुटुंबातील रुग्ण महिला भगिनी रेखा तानाजी लांडे अकोले यांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून १ लाख रुपयांची रुपयांची आर्थिक मदत मंजूर झाली आहे.

रेखा लांडे ह्या हे गेल्या काही काळापासून अपघातग्रस्त असुन त्या आजाराशी झुंज देत असून, उपचारासाठी मोठा खर्च होत आहे. आर्थिकदृष्ट्या दुर्बल असलेल्या या कुटुंबासाठी एवढा खर्च परवडणारा नव्हता. याची दखल घेत मंत्रालय प्रतिनिधी संकेत सानप यांनी वैद्यकीय कागदपत्रांसह शासन दरबारी पाठपुरावा करून मदतीची फाईल मुख्यमंत्री सहाय्यता निधीकडे पाठवली. अखेरीस त्यांच्या प्रयत्नांना यश मिळाले आणि मुख्यमंत्री सहाय्यता निधी प्रमुख रामेश्वर नाईक यांच्या मार्गदर्शनाखाली १ लाख रुपयांची मदत मंजूर करून रुग्णाच्या कुटुंबाच्या हाती पोहचवण्यात आली.दीपक जाधव मेडिकल हॉस्पिटल संगमनेर अहिल्यानगर नवीन आठवले रोड बीएड कॉलेज जवळ श्रीराम नगर गुंजाळवाडी संगमनेर रेखा तानाजी लांडे या ठिकाणी ॲडमिट आहेत एक लाख रुपयांचा निधी वर्ग करण्यात आला आहे संकेत तुकाराम सानप यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. या मदतीमुळे अकोले तालुक्यातील रेखा लांडे येथील कुटुंबाला मोठा दिलासा मिळाला आहे. रुग्णालयातील वाढते खर्च, औषधोपचार व इतर वैद्यकीय गरजा पूर्ण करण्यासाठी ही मदत उपयोगी ठरणार आहे. या निर्णयाबद्दल गावकरी, सामाजिक कार्यकर्ते आणि स्थानिक जनतेकडून संकेत सानप यांचे अभिनंदन होत आहे. रेखा तानाजी लांडे कुटुंबीयांनी या मदतीबद्दल मुख्यमंत्री, निधी प्रमुख तसेच संकेत तुकाराम सानप यांचे आभार मानले असून गावातील नागरिकांनीही या उपक्रमाचे स्वागत केले आहे. सामाजिक कार्य आणि जनसेवा हाच मार्ग निवडलेल्या संकेत सानप यांच्या या कार्यामुळे तरुण पिढीला प्रेरणा मिळत आहे. शासनाची मदत जनतेच्या हाती'' हा उद्देश साध्य करताना आदर्श तिगावचे सुपुत्र संकेत तुकाराम सानप यांनी दिलेला हा दिलासा समाजातील वंचितांसाठी आशेचा किरण ठरला आहे.

---

जा.क्र./न.प./अंबड/नामांतर/२०२५/७५०
कार्यालय नगर परिषद, अंबड
दिनांक :- १९/१२/२०२५

नाव बदलण्याचा

**जाहिरनामा**

अर्जदार श्री/सौ/श्रीमती : १) गणपत कचरु भोसले २)महेश भारत सुर्यवंशी सर्व्हे नं.-३० सिटी सर्व्हे न. २९९३ सहन प्लॉट नं. ४६ नं.प.मि.नं.१८-१५१-४६ व सहन प्लॉट नं. ४७ नं.प.मि.नं.१८-१५१-४७ चे हस्तांतर करणे बाबात

सर्व जनतेस या जाहिरनाम्याद्वारे कळविण्यात येते की, सदरील अर्जदार नकाशात वरील न.प.मालमत्ता घर क्र. ( १८-१५१-४६, १८-१५१-४७) दर्शविलेल्या प्रमाणे मोहल्ला येथे इमारतीचे/जागेचे नांव बदलून घेऊ इच्छीतों ज्याची चतु:सिमा खालील प्रमाणे आहे. जर कोणास या बददल आक्षेप असेल तर त्यांनी हा जाहिरनामा प्रसिध्द झाल्यापासुन (१५) पंधरा दिवसाचे आत कार्यालय नगर परिषद, अंबड येथे लेखी आक्षेप सादर करावा. नसता कोणती ही तक्रार ग्राहय धरली जाणार नाही.

चतुः सिमा
पुर्व- प्लॉट नं. ३३ व ३४
पश्चिम :६ मिटर रुंदीचा कॉलनी अंतर्गत रस्ता
दक्षिण- ३० मिटर रुंदीचा रिंग रोड
उत्तरः प्लाट नं. ४५

स्वाक्षरित
**मुख्याधिकारी**
नगर परिषद, अंबड

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड- ४३१ १२२**
**दिनांक १० नोव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / १७९१**

**जाहिर प्रगटन**

CONSUMER CASE NO. DC/470/CC/167/2024
PRAKASH S/O. VISHWANATH KALE
Versus
JIJAU MA SAHEB MULTI STATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BEED. MAIN BRANCH RAJIV GANDHI CHOWK BEED BRANCH MANAGER, ASHWINI W/O SUNIL WANDHARE

To,
Opposite Party / Respondent Name: 1. JIJAU MA SAHEB MULTI STATE CO-OP. CREDIT SOCIETY LTD. BEED. MAIN BRANCH RAJIV GANDHI CHOWK BEED BRANCH MANAGER, ASHWINI W/O
SUNIL WANDHARE R/O RAJIV GHANDHI CHOWK CANOL ROAD BEED., TQ. BEED., MAHARASHTRA BEED-

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६, रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत.जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ०४/११/२०२५
ठिकाण - बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड- ४३१ १२२**
**दिनांक १० नोव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / १७९२**

**जाहिर प्रगटन**

CONSUMER CASE NO. DC/470/CC/236/2023
SAVITA BABASAHEB CHAVAN
Versus
JIJAU MAASAHEB MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY THROUGH ASHWINI SUNIL WANDARE

To.
Opposite Party / Respondent Name:
1. JIJAU MAASAHEB MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY THROUGH ASHWINI SUNIL WANDARE JIJAU MAASAHEB MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY RAJIV GANDHI CHOUK BEED, MAHARASHTRA BEED- 2. ANITA BABAN SHINDE JIJAU MAASAHEB MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY RAJIV GANDHI CHOUK CANOL ROAD BEED, MAHARASHTRA BEED- 3. BHARAT HARIDAS SAWANT JIJAU MAASAHEB MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY RAJIV GANDHI CHOUK CANOL ROAD BEED, MAHARASHTRA BEED-
4. RAMBHAU DAMU KAMBALE JIJAU MAASAHEB MULTISTATE CO-OP, CREDIT SOCIETY RAJIV GANDHI CHOUK CANOL ROAD BEED, MAHARASHTRA BEED-
5. SUDAM RUSTUM KALE JIJAU MAASAHEB MULTISTATE CO-OP. CREDIT SOCIETY RAJIV GANDHI CHOUK CANOL ROAD BEED, MAHARASHTRA BEED-

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फी आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ०४/११/२०२५
ठिकाण - बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड- ४३१ १२२**
**दिनांक १० नाव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / १७८६**

**जाहिर प्रगटन**

CONSUMER CASE NO. DC/470/CC/344/2025
AYODHYABAI.BANSHI DARADE
Versus
DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT CO. LTD.

To.
Opposite Party / Respondent Name:
1. DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT CO. LTD. BRANCH HEAD DYANRADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED TQ AND DIST BEED, MAHARASHTRA BEED-431122
2. CHAIRMAN SURESH. DNYANOBA KUTE DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT CO. LTD. NEAR CHAMDA FAKTI, M.I.D.C. BEED DIST. BEED.431122, MAHARASHTRA BEED-431122
3. BRANCH MANAGER DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD. BRANCHES. WADWANI DIST.BEED, MAHARASHTRA BEED-431144, 4. SAMRIDDHI JANARDHAN JADHAV OFFICE OF DEPUTY REGISTRAR, BEED TO DISTRICT BEED, MAHARASHTRA BEED-431122

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ०४/११/२०२५
ठिकाण - बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड- ४३१ १२२**
**दिनांक ०३ डिसेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / २०५७**

**जाहिर प्रगटन**

CONSUMER CASE NO. DC/470/CC/218/2023
BALIRAM CHANGDEV BHOSALE
Versus
JIJAU MA SAHEB MULTISTATE CO LI THOURGH BRANCH MANAGER ASHWINI SUNIL WANDARE

To.
Opposite Party / Respondent Name:
1. JIJAU MA SAHEB MULTISTATE CO LI THOURGH BRANCH MANAGER ASHWINI SUNIL WANDARE JIJAU MA SAHEB MULTISTATE CO LI RAJIV GANDHI CHOWK CANOL ROAD BEED, MAHARASHTRA BEED-
2. ANITA BABAN SHINDE JIJAU MA SAHEB MULTISTATE CO LI RAJIV GANDHI CHOWK CANOL ROAD BEED, MAHARASHTRA BEED

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फा आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक २८/११/२०२५
ठिकाण - बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड- ४३१ १२२**
**दिनांक ०३ डिसेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / २०५८**

**जाहिर प्रगटन**

CONSUMER CASE NO. DC/470/CC/226/2023
SIMA CHANDRAKANT JOSHI
Versus
JIJAU MA SAHEB MULTISTATE CO LI THROUGH ASHWINI SUNIL WANDHARE

To,
.....Opposite Party/Respondent(s)
Opposite Party / Respondent Name:
1. JIJAU MA SAHEB MULTISTATE CO LI THROUGH ASHWINI SUNIL WANDHARE RAJIV GANDHI CHOWK CANOL ROAD BEED TO DIST BEED, MAHARASHTRA BEED- 2. ANITA BABAN SHINDE RAJIV GANDHI CHOWK CANOL ROAD BEED TO DIST BEED, MAHARASHTRA BEED-
3. BHARAT HARIDAS SAWANT RAJIV GANDHI CHOWK CANOL ROAD BEED TO DIST BEED, MAHARASHTRA BEED, 4. RAMBHAU DAMU KAMBALE RAJIV GANDHI CHOWK CANOL ROAD BEED TO DIST BEED, MAHARASHTRA BEED, 5. SUDAM RUSTUM KALE RAJIV GANDHI CHOWK CANOL ROAD BEED TO DIST BEED, MAHARASHTRA BEED-

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे. यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब. पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फी आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक २६/११/२०२५
ठिकाण - बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड.

---

**जिल्हा ग्राहक तक्रार निवारण न्यायमंच**
**बीड जिल्हा कार्यालय**
**शाहूनगर, पांगरी रोड, बीड- ४३१ १२२**
**दिनांक १० नोव्हेंबर, २०२५**
**जा.क्र.जि.ग्रा.मं./बीड / १७९०**

**जाहिर प्रगटन**

CONSUMER CASE NO. DC/470/CC/345/2025
VIMAL SADASHIV DARADE
Versus
DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT CO. LTD.

To,
Opposite Party / Respondent Name: 1. DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT CO. LTD. BRANCH HEAD DYANRADHA BHAVAN, JALNA ROAD, BEED, MAHARASHTRA BEED-431122 2. CHAIRMAN SURESH. DNYANOBA KUTE DNYANRADHA MULTISTATE CO OP CREDIT CO. LTD NEAR CHAMDA FAKTI, M.I.D.C. BEED DIST. BEED.431122, MAHARASHTRA BEED-431122
3. BRANCH MANAGER GNANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD. DHANORA ROAD BEED TO AND DIST BEED, MAHARASHTRA BEED-431122 4. BRANCH MANAGER GNANRADHA MULTISTATE CO OP CREDIT SO.LTD. BRANCHES. WADWANI DIST.BEED, MAHARASHTRA BEED-431144
5. SAMRIDDHI JANARDHAN JADHAV
OFFICE OF DEPUTY REGISTRAR, BEED TO DISTRICT BEED, MAHARASHTRA BEED-431122

वर नमुद तक्रारदार यांना विरुध्द पक्ष यांच्या विरुध्द ग्राहक संरक्षण कायद्यान्वये वर नमुद तक्रार दाखल केलेली आहे.यातील विरुध्द पक्ष यांना नोटीस पाठविली असता ते स्विकारत नाही / पत्ता बदल झालयामुळे मिळुन येत नाही. म्हणून तक्रारदारांनी केलेल्या विनंतीनुसार या जाहिर नोटीस व्दारे आपणास कळविण्यात येते की, विरुध्द पक्ष यांनी वर नमुद या आयोगाच्या पत्यावर दिनांक २१/०१/२०२६ रोजी सकाळी १०:३० वाजता स्वता. अगर वकिल किंवा प्राधिकृत प्रतिनिधि मार्फत उपस्थित राहून आपला लेखी जबाब, पुरावा व प्रतिज्ञालेख दाखल करावेत. जर विरुध्द पक्षांनी याकामी कसूर केल्यास मा. आयोगाव्दारे एकतर्फी आदेश पारित करणेत येवुन पुढील कार्यवाही करण्यात येईल याची दखल घ्यावी.

मा. जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड यांची आदेशानुसार.

दिनांक ०४/११/२०२५
ठिकाण - बीड

स्वाक्षरीत
**प्रबंधक**
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोग, बीड.

# दुष्काळी अनुदानात वडवणी तालुक्यात मोठा घोटाळा ?

## तहसिलमधील कर्मचारी व तलाठ्याच्या रायटरचा सहभाग

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी तालुक्यांमध्ये सन २०२३-२४व २९२४-२५ च्या दुष्काळ आणि अतिवृष्टीच्या अनुदानामध्ये मोठा घोटाळा झाला आहे.एकाच गावातील लाभार्थ्यांचे अनेक गावांमध्ये नावे असून यामध्ये वडवणी तहसील मधील एका कर्मचाऱ्याचा आणि एका तलाठ्याच्या रायटरचा सहभाग असून या दोघांच्या संगनमताने चिखल बीड येथील लाभार्थ्यांचे अनेक गावांमध्ये नाव दाखवून लाखो रुपयाचा भ्रष्टाचार केला असून या खाजगी एजंटसह तहसील मधील कर्मचाऱ्यावर कारवाईची मागणी शेतकरी करू लागले आहेत.

**मंडळ अधिकाऱ्यामार्फत याची चौकशी सुरू आहे चौकशीचा अहवाल आल्यावर सत्य काय आहे ते कळेल**
**वैभव महेंद्रकर**
**तहसीलदार वडवणी**

यासंदर्भातच माजलगाव चे आमदार प्रकाश सोळंके यांनी जिल्हाधिकाऱ्यांना पत्र लिहिले असून त्यावर अद्यापही प्रशासनाच्या वतीने कुठलीच कारवाई करण्यात आलेली नाही यामध्ये तहसीलदाराचा ही हात आहे का असा सवाल आता उपस्थित केला जात असुन कर्मचाऱ्याला आणि खाजगी एजंटला तहसील प्रशासन का पाठीशी घालत आहे. या घोटाळ्यात आणखीन कोणा कोणाचे हात काळे झाले आहेत का याचा तपास होऊन शेतकऱ्याचे हक्काचे पैसे लाटणाऱ्या त्या तहसील कर्मचारी आणि तलाठी रायटर यांच्यावर कारवाई होणे गरजेचे आहे.

### चार गावाच्या यादीत ५० लाभार्थी बाहेरील

वडवणी तालुक्यातील चार गावची यादी पाहता यामध्ये बाहेरील गावातील लोकांचे नावे आहेत या लोकांच्या नावावर कुठली शेती नसताना देखील यांना अनुदान भेटावे म्हणून तहसील कर्मचारी आणि तलाठी रायटर यांनी संगणमत करून बोगस लाभार्थ्यांचे आयडी तयार करून लाखो रुपये शासनाचे लुटले आहेत.

### वडवणी तहसीलदाराचाही घोटाळ्यात सहभाग ?

वडवणी तहसीलमधील कर्मचारी आणि चिखलबडी येथील तलाठ्याचे रायटर या दोघांनी संगणमताने बोगस लाभार्थ्यांच्या आयडी तयार करून दुष्काळी आणि अतिवृष्टीच्या यादीमध्ये बोगस लाभार्थ्यांची नावे वाढवली यामध्ये वडवणी तहसीलदारांचाही हात आहे का ?वडवणी तहसीलदारांच्या सहमतीने हा घोटाळा झाल्याचे बोलले जात आहे.

# बीड शहर विकास आघाडीच्या गटनेतेपदी खुर्शीद आलम

**बीड । प्रतिनिधी**

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्ष यांच्या निर्वाचित सदस्यांकडून बीड शहर विकास आघाडीची स्थापना करण्यात आली असुन, गटनेते पदी खुर्शीद आलम यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. पक्षाशी एकनिष्ठ आणि विकासासाठी संघर्षशील असलेले कार्यकर्ते खुर्शीद आलम यांना यामाध्यमातुन न्याय मिळाला आहे.

बीड नगरपरिषद निवडणुक २०२५ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरदचंद्र पवार व शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे हे दोन्ही पक्ष एकत्र मिळून लढले होते. त्यामध्ये या आघाडीकडून १३ उमेदवार निवडून आले आहेत. निवडून आलेल्या उमेदवारांनी बीड शहर विकास आघाडी स्थापन करून गटनेते पदी खुर्शीद आलम यांची एकमुखाने निवड केली. या संदर्भात बुधवार (दि.३१) रोजी राष्ट्रवादी भवन येथे बैठक पार पडली. या बैठकीत आ.संदिप क्षीरसागर, माजी.आ.सय्यद सलीम, राष्ट्रवादी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हाध्यक्ष उल्हास गिराम यांची प्रमुख उपस्थिती होती. गटनेते पदी निवडून आल्या बद्दल खुर्शीद आलम यांचे तसेच सर्व निर्वाचित नगर परिषद सदस्यांचे आ.संदिप क्षीरसागर माजी.आ.सय्यद सलीम, जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के, जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. यावेळी पक्षातील पदाधिकारी, कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मृत व्यक्तीच्या नावे मजुरी ; ग्रामसेवकावर भ्रष्टाचाराचे आरोप

**शिरूर कासार । प्रतिनिधी**

मातोरी ग्रामपंचायतीत रोजगार हमी योजनेत मोठा गैरव्यवहार उघड झाला आहे. ग्रामरोजगार सेवक बळीराम काकासाहेब जरांगे यांनी मृत व्यक्तीच्या नावे मजुरीचे पैसे उचलल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. याप्रकरणी गटविकास अधिकारी, पंचायत समिती शिरूर कासार यांच्याकडे तक्रार दाखल झाली आहे. सखोल चौकशीची मागणी करण्यात आली आहे.

तक्रारीनुसार, मातोरी येथील शिवाजी सखाराम जरांगे यांचा मृत्यू २९ नोव्हेंबर २०२४ रोजी झाला. तरीही, २० जून २०२५ ते २ जुलै २०२५ या काळात त्यांच्या नावे मस्टर भरून ३७४४ रुपये उचलण्यात आले. काही रकमा रिजेक्ट झाल्याचेही नमूद आहे. मृत व्यक्ती कामावर कशी येऊ शकते, असा सवाल ग्रामस्थांनी उपस्थित केला आहे. फक्त मृत व्यक्तीच नव्हे, तर बळीराम जरांगे यांनी स्वतःच्या आणि कुटुंबियांच्या नावावरही योजनांचा गैरवापर केल्याचे तक्रारीत म्हटले आहे. त्यांनी स्वतःच्या नावे पंतप्रधान आवास योजनेतून घरकुल मंजूर करून घेतले. कोणत्याही अटींचे पालन न करता हे मंजूर झाले, असा आरोप आहे. पत्नी अनिता जरांगे यांच्या नावे गायगोठा मंजूर करून तो दुसऱ्याच्या जमिनीवर दाखवण्यात आला. वडील काकासाहेब विनायक जरांगे आणि भाऊ लक्ष्मण काकासाहेब जरांगे यांच्या नावेही २०२४-२५ मध्ये गायगोठे मंजूर झाले. प्रत्यक्षात हे गोठे प्रस्तावित जागेवर बांधलेले नाहीत. बोगस मस्टर भरून निधी हडप केल्याचा आरोप आहे. या प्रकरणात ग्रामसेवक, सरपंच आणि ग्रामपंचायत अधिकारी यांनी संगनमत केल्याचा आरोप करण्यात आला आहे. चौकशी समिती गठीत करून दोषींवर फौजदारी गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी देवपिदास भास्कर जरांगे, नारायण जनार्दन जरांगे यांच्यासह ग्रामस्थांनी केली आहे. चौकशी पूर्ण होईपर्यंत संबंधित कामांचे देयके रोखावीत, अशी विनंती प्रशासनाला करण्यात आली आहे. तक्रारीच्या प्रती जिल्हाधिकारी बीड, मुख्य कार्यकारी अधिकारी आणि राज्य रोजगार हमी मंत्र्यांकडे पाठवण्यात आल्या आहेत. यावर देवपिदास भास्कर जरांगे, नारायण जनार्दन जरांगे, ज्ञानेश्वर दिनकर जरांगे, प्रल्हाद पाहीलबुवा जरांगे, प्रविण कशिनाथ बाटे, हनुमान भाऊराव बाटे, राजेंद्र सिध्देश्वर जरांगे आदींच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# कार खरेदीचा बहाणा करून कार लुबाडणारी टोळी उघडकीस

## बीड शहर पोलिसांनी केले अमरावती येथून दोन आरोपींना अटक

बीड । प्रतिनिधी

कार खरेदी करण्याचा बहाणा करून वाहन मालकांची फसवणूक करणारी टोळी बीड शहर पोलिसांनी उघडकीस आणली आहे. या प्रकरणात अमरावती येथील दोन आरोपींना अटक करण्यात आली असून त्यांनी कार खरेदीच्या नावाखाली वाहन ताब्यात घेऊन ती परत न करता फसवणूक केल्याचे निष्पन्न झाले आहे.



फिर्यादी सचिन आसाराम बोराडे, राहणार माळीवेस बारादरी बीड, कडून त्याच्या मालकीची स्विफ्ट डिझायर कार, कार खरेदी करण्याचा बहाणा करून आरोपींनी सुरुवातीला काही रक्कम ॲडव्हान्स स्वरूपात दिली. उर्वरित पैसे कागदपत्रे तयार करून आणतो, आणि राहिलेले श्रीराम फायनान्स चे सर्व हप्ते भरतो अशी बतावणी केली, असे सांगून त्यांनी कार ताब्यात घेतली. मात्र, वाहनाच्या कागदपत्रांवर कोणतीही कायदेशीर सही करण्यात आली नाही तसेच उर्वरित रक्कमही दिली गेली नाही. त्यानंतर सदरील कार परत न करता आरोपी फरार झाले.

या संदर्भात फिर्यादीकडून तक्रार दाखल झाल्यानंतर बीड शहर पोलिसांनी तत्काळ तपास सुरू केला. तपासादरम्यान अमरावती येथील गुड्डू खान रेहमत खान वय ४० वर्षे, राहणार बिस्मिल्ला नगर, लाल खडी रोड, अमरावती आणि अब्दुल राजीक पान ३ वर

# सुंदरराव सोळंके महाविद्यालयास प्रशासकीय व शैक्षणिक अंकेक्षणात विद्यापीठाकडून अ प्लस दर्जा प्राप्त

माजलगाव । प्रतिनिधी

सुंदरराव सोळंके महाविद्यालयाला डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर यांच्या कडून प्रशासकीय व शैक्षणिक अंकेक्षणामधील सर्वच निकषांमध्ये महाविद्यालयास ३९५ गुण (८७.७७ टक्के) देऊन अ प्लस दर्जा दिला आहे.



अंकेक्षण प्रकियेत महविद्यालयातील अभ्यास नियोजन, अध्ययन, अध्यापन व मुल्यमापन पध्दती, संशोधन व नवोउपक्रम, पायाभुत सुविधा, विद्यार्थी सहाय्यता, प्रशासन व नेतृत्व आणि गुणवता या सातही निकषावर महाविद्यालयाची सखोल तपासणी करण्यात आली. सर्वच निकषामध्ये महाविद्यालयाची कामगिरी समाधानकारक व दर्जेदार आढळून आल्याने विद्यापीठाच्या प्रशासकीय व शैक्षणिक अंकेक्षण () समितीने महाविद्यालयास अ प्लस दर्जा प्रदान केला आहे.

सुसज्ज ग्रंथालय, आय सी टी सुविधांचा प्रभावी वापर, संशोधनास प्रोत्साहन, विविध अभ्यासपूर्वक व सामाजिक उपक्रम राबवले जातात. तसेच प्रशासनात पारदर्शकता, नियोजनबध्द पान ३ वर



# नविन वर्षाच्या सुरुवातीला अंभोरा पोलिस ठाण्याचा अवैध धंदे करणाऱ्यांना दणका

कडा । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यातील अंभोरा पोलिस ठाणे हे कायमच वेगवेगळ्या प्रकरणामुळे चर्चेत असते दि .३०डिसेंबर रोजी ऑपरेशन न्यू इयर अंतर्गत पोस्ट अंभोरा हद्दीमध्ये अवैद्य दारू विक्रेत्यावर ०३ ठिकाणी कारवाई करून १०१४०/-रु चा मुद्देमाल तसेच शालेय परिसरामध्ये तंबाखूजन्य पदार्थाची विक्री करणाऱ्या विक्रेत्यावर ०२ कारवाई करून १५६०/-रु चा तंबाखूजन्य मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

सदरची पान ३ वर

# क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जयंती उत्सव व भव्य स्मारक भूमिपूजन सोहळ्यास उपस्थित रहावे - ॲड.सतीश शिंदे

बीड । प्रतिनिधी

क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांच्या जयंतीनिमित्त दि. ३ जानेवारी २०२६ रोजी सावित्रीबाई फुले जन्मगाव नायगाव तालुका खंडाळा जिल्हा सातारा येथे क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले जयंती उत्सव सोहळा तसेच ज्ञानज्योती सावित्रीमाई फुले स्मारक भूमिपूजन समारंभ भव्य स्वरूपात आयोजित करण्यात आला आहे. हा स्मारक भूमिपूजन सोहळा राज्याचे मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस यांच्या शुभहस्ते सकाळी १०.३० वाजता संपन्न होणार आहे. या सोहळ्यास महाराष्ट्रातील महात्मा फुले युवा दलाचे प्रमुख पदाधिकारी, जिल्हाप्रमुख, तालुका प्रमुख व कार्यकर्त्यांसह समाज बांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड.सतिश शिंदे यांनी केले आहे.



क्रांतीज्योती सावित्रीमाई फुले यांचे जन्मगाव नायगाव ता.खंडाळा जि.सातारा येथे जयंती उत्सव व स्मारकाचे भूमिपूजन सोहळा संपन्न होणार असून या सोहळ्यासना. मुख्यमंत्री ना.देवेंद्रजी फडणवीस, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, उपमुख्यमंत्री ना.अजितदादा पवार, उपमुख्यमंत्री ना. एकनाथराव शिंदे, ओबीसी कल्याण, दग्धविकास, उर्जा नुतनीकरण मंत्री ना.अतुल सावे, ग्रामविकास व पंचायत राज मंत्री ना. जयकुमार गोरे, अन्न व नागरी पुरवठा मंत्री ना. छगनराव भुजबळ,पर्यावरण व वातावरणीय बदल मंत्री ना.पंकजाताई मुंडे, पर्यटन तथा पालकमंत्री ना.शंभूराज देसाई, मदत व पुनर्वसन मंत्री ना.मकरंद पाटील, सार्वजनिक बांधकाम मंत्री ना.शिवेंद्रसिंह राजे भोसले, महिला व बालविकास मंत्री ना. आदिती तटकरे आदी मंत्री महोदय यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे. तसेच अनेक आमदार, खासदार व सामाजिक कार्यकर्ते उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यास महात्मा फुले युवा दलाच्या वतीने संपूर्ण महाराष्ट्रातील जिल्हा व तालुकास्तरीय पदाधिकारी, कार्यकर्ते तसेच नागरिकांनी व समाज बांधवांनी बहुसंख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक प्रमुख ॲड. सतीश शिंदे यांनी केले आहे.

# जायकवाडी वसाहतीवर बुलडोझर फिरणार १० वी, १२ वी परीक्षेच्या काळात घरांवर गदा

## निर्णय रद्द करा नसता आंदोलन, घर रिकामे करण्यासाठी वेळ वाढवून द्या - बदामराव पंडित

गेवराई । प्रतिनिधी

पाटबंधारे विभागाच्या जायकवाडी सिंचन वसाहतीमध्ये अनेक ठिकाणी अनेक जण अतिक्रमण करून राहत आहेत. या घरांवर बुलडोझर फिरवणार असल्याने येथील लोकांनी तात्काळ घर खाली करावे असे पत्रक जायकवाडी सिंचन जातेगाव शाखा क्रमांक ५, शाखाधिकारी नागेश एच गट्टूवार यांनी काढले आहे. सध्या दहावी आणि बारावी बोर्ड परीक्षेचे दिवस असून, कडाक्याची थंडीही आहे.



अशावेळी तात्काळ घरावर बुलडोझर फिरवून लोकांना आणि शालेय विद्यार्थ्यांना बेघर करण्यापेक्षा घर रीकामे करण्यासाठी त्यांना थोडा वेळ वाढवून द्यावा अशी मागणी भाजपा नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी केली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, जायकवाडी सिंचन वसाहत ही जायकवाडीतील कर्मचाऱ्यांना राहण्यासाठी उभा करण्यात आली होती. पान ३ वर

# आता बोंबला! सिरसमार्ग-पारगाव रस्ता गेला खड्ड्यात

## अपडाऊन करणारांचे मोडले कंबरडे, मार्केटवरही झाला परिणाम

बीड । प्रतिनिधी

आता बोंबला! असे म्हणण्याची वेळ गेवराई तालुक्यातील सिरसमार्गसह परिसरातील ग्रामस्थांवर आली आहे. त्याचे कारणही तसेच आहे, बीड शहरात येण्यासाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या सिरसमार्ग ते पारगाव रस्त्याची पार वाट लागली आहे. रस्त्यात खड्डा कि खड्ड्यात रस्ता असे म्हणण्याची वेळ आल्याने दररोज ये-जा करणार्यांचे मोठे हाल होत आहेत. याचा परिणाम ग्रामीण भागातील मार्केटवरही झाल्याचे दिसून येत आहे.



सिरसमार्गसह परिसरातील दहा ते पंधरा गावे-वाड्या व कोळगावसह परिसरातील वाटसरु जवळचा रस्ता म्हणून सिरसमार्ग ते पारगाव या रस्त्याचा वापर करत बीड या जिल्ह्याच्या ठिकाणी ये-जा करतात. सिरसमार्गवरुन बीड अठरा किमी आहे, तर मादळमोही, पाडळसिंगी या मार्गे बीडला गेल्यास पस्तीस ते चाळीस किमी अंतर पडते. त्यामुळे हा जवळचा रस्ता असल्याने यावरुन मोठ्या प्रमाणावर रहदारी आहे. सिरसमार्गसह परिसरातील विद्यार्थी-विद्यार्थीनी, नोकरी, व्यवसाय व रोजगारासाठी दररोज ये-जा करणारे प्रवाशी, बीड या जिल्ह्याच्या ठिकाणावरुन किराणा, स्टेशनरी सामान आणणारे व्यावसायिक अशा सर्वांसाठीच सिरसमार्ग ते पारगाव हा नित्याचा रस्ता आहे. नुकताच आलेला महापूर, जड वाहनांची वाहतूक व वेळोवेळी खड्डे न बुजविणे यामुळे रस्त्याची पार वाट लागली आहे. रस्ता चांगला नसल्याने सिरसमार्ग येथे बाहेरगावहून येणारे रुग्ण यांनाही त्रासाला सामोरे जावे लागते, शिवाय सिरसमार्ग येथे खरेदीसाठीही येण्यास ग्राहक टाळत आहेत. त्यामुळे हा अत्यंत महत्त्वाचा रस्ता असल्याने रुंदीकरणासह नव्याने डांबरीकरण करावे अशी मागणी ग्रामस्थांसह परिसरातील नागरिकांतून होत आहे.

### रस्ता डांबरीकरणही होईना

सिरसमार्ग ते सिरसमार्ग फाटा या रस्त्यावर डांबरीकरणाचे काम गेल्या दीड वर्षापासून सुरू आहे. या रस्त्यावर खडीकरण झाले आहे. यावरही आता खाचखळगे झाले असून खडी उखडली आहे. ग्रामस्थांनी संबंधीत कंत्राटदारला विचारले असता बजट दिले नसल्याचे सांगतात. या-ना त्या कारणाने सिरसमार्गकरांसाठी महत्वाचे असलेले रस्ते होत नसल्याने आता बोंबला! म्हणण्याची वेळ सर्वसामान्यांवर आली आहे. सामान्यांचा वाली कोणी आहे की नाही, अशा संतप्त प्रतिक्रियाही उमटू लागल्या आहेत.

# आपली नजर, मन व चारित्र्य पवित्र ठेवा- विश्वनाथ स्वामी महाराज

## मानूर येथील अखंड शिवनाम सप्ताहाची काल्याच्या कीर्तनाने सांगता

शिरूर कासार । प्रतिनिधी

तालुक्यातील मानूर येथे लिंगैक्य श्रीगुरू विरूपाक्ष शिवाचार्य महाराज यांच्या २० व्या पुण्यस्मरणानिमित्त आयोजित अखंड शिवनाम सप्ताह व ग्रंथराज परम रहस्य पारायण सोहळ्याची सांगता दि. ३१ डिसेंबर रोजी काल्याच्या कीर्तनाने मोठ्या भक्तिभावात पार पडली. सकाळी ११ वाजता जहागीरदार मठसंस्थान, मानूर येथे विश्वनाथ स्वामी महाराज यांच्या काल्याच्या कीर्तनाने सप्ताहाचा समारोप झाला.

यावेळी आपल्या प्रवचनात विश्वनाथ स्वामी महाराज म्हणाले, ''आपली नजर, मन व चारित्र्य पवित्र ठेवा, हाच खरा शिवभक्तीचा मार्ग आहे. जीवनात सदाचार, संयम आणि भक्ती या तीन गोष्टी आत्मसात केल्या तर मानवाचे जीवन सार्थ ठरते.'' त्यांच्या प्रेरणादायी प्रवचनाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले. हा भव्य धार्मिक सोहळा बुधवार दि. २४ डिसेंबर ते बुधवार दि. ३१ डिसेंबर २०२५ या कालावधीत मानूर



येथील जहागीरदार मठसंस्थानात पार पडला. मानूर मठाचे मठाधिपती श्री गुरु विरूपाक्ष शिवाचार्य मानूरकर महाराज यांच्या मार्गदर्शनाखाली विविध धार्मिक व आध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या सप्ताहात शंभुलिंग शिवाचार्य महाराज, राचलिंग शिवाचार्य महाराज, काशीनाथ शिवाचार्य महाराज, सिद्धचैतन्य शिवाचार्य महाराज, प्रभुदेव शिवाचार्य महाराज, सदाशिव शिवाचार्य महाराज यांची उपस्थिती लाभली. त्यांच्या आशीर्वचनांचा लाभ भाविकांना मिळाला.

या कालावधीत नागनाथ देवस्थान येथे दररोज लघुरुद्र अभिषेक, महापूजा, पारायण, आशीर्वचन, गाथाभजन, प्रवचन, शिवपाठ, शिवकीर्तन, शिवजागर आदी पान ३ वर




This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26


हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# आंबेगाव तालुक्यात पुन्हा राजकीय भूकंप; माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील स्वगृही परतणार ?

**आंबेगाव । प्रतिनिधी**

शिरूर लोकसभेची उमेदवारी मिळावी म्हणून २०२४ साली शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केलेले माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांचे मन राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात रमत नसल्याचे संकेत मिळत आहेत. आढळराव पाटील यांची सध्याची राजकीय परिस्थिती आणि भवितव्य पाहता ते पुन्हा शिवसेनेत स्वगृही परतणार असल्याचे विश्वसनीय सूत्रांकडून समजते. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे ज्येष्ठ नेते दिलीप वळसे पाटील यांच्या बरोबरीने गेली दोन वर्ष पक्षाचे काम करत असताना आढळराव पाटील यांचा राजकीय आलेख कमी होत चालला असल्याचे दिसून आल्यामुळेच त्यांनी पुन्हा स्वगृही परतण्याचा निर्णय घेतला असावा, असा राजकीय तज्ज्ञांना अंदाज आहे.

२००४ साली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातून शिवसेनेमध्ये प्रवेश करून शिवाजीराव आढळराव पाटील यांनी प्रथम शिरूर लोकसभेची निवडणूक लढवली. आपल्या पहिल्याच खासदारकीच्या निवडणुकीत पुणे जिल्ह्यातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या बालेकिल्यात आढळराव पाटील विजयी झाले. सलग तीन वेळा शिरूर लोकसभेचे प्रतिनिधित्व करणारे आढळराव पाटील शिवसैनिकांच्या मनात भरले. पश्चिम महाराष्ट्रातील शिवसेना तारण्याचे काम खऱ्या अर्थाने आढळराव पाटील यांनी केले. दरम्यान २०१९ साली झालेल्या लोकसभेच्या निवडणुकीत आढळराव पाटील यांना राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार डॉ.अमोल कोल्हे यांच्याकडून पराभव पत्करावा लागला. मात्र, पराभवानंतर देखील शिवाजीराव आढळराव पाटील यांनी आपल्या लांडेवाडी येथील निवासस्थानी असणारा प्रत्येक रविवारी भरणारा जनता दरबार चालूच ठेवला आणि ते सातत्याने लोकसंपर्कात राहिले आणि अद्यापही आहेत. दरम्यानच्या कालखंडात उद्धव ठाकरे यांच्या दरबारात आढळराव पाटील यांना मानाचे स्थान मिळत नसल्याने त्यांनी, एकनाथ शिंदेच्या मार्गदर्शनाखाली शिवसेनेत प्रवेश केला आणि शिंदेंचे विश्वासू सहकारी म्हणून आढळराव पाटील पश्चिम महाराष्ट्रात परिचित झाले. २०२४ साली पुन्हा लोकसभेच्या निवडणुका आल्या.



राज्यात भाजपा-शिवसेना आणि राष्ट्रवादी काँग्रेस अशी महायुती असल्याने शिरूर लोकसभेची उमेदवारी साहजिकच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडे गेली. त्यामुळे उमेदवारी मिळण्यासाठी आढळराव पाटील यांनी पुन्हा शिवसेनेतून राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केला. गेली दीड, दोन वर्ष ते राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे कामकाज अत्यंत इमाने - इतबारे करत आहेत. दरम्यानच्या कालखंडात नुकत्याच नगरपंचायत आणि नगरपरिषदेच्या निवडणुका पार पडल्या. झालेल्या निवडणुकांमध्ये उत्तर पुणे जिल्ह्यात शिवसेनेला चांगले यश मिळाले.

जुन्नरचे आमदार शरद सोनवणे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेने उत्तर पुणे जिल्ह्यातील नगरपंचायतीच्या निवडणुका लढवल्या. या निवडणुकांमध्ये असे दिसून आले की जिल्ह्यात शिवसेनेचे प्राबल्य वाढत चालले आहे. विशेषत: आंबेगाव तालुक्याची राजकीय राजधानी असलेल्या मंचर नगरपंचायतीच्या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते म्हणून दिलीप वळसे पाटील आणि माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मंचर नगराध्यक्ष पदाचा उमेदवार निवडून यावा यासाठी खूप मेहनत घेतली.

मात्र, प्रत्यक्षात मंचरचा नगरपंचायतीचा नगराध्यक्ष पदाचा उमेदवार हा शिवसेनेचा निवडून आला. त्यामुळे आढळराव पाटील यांना राजकीय धक्का बसल्याचे देखील मानले जात आहे. भविष्यकाळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षापेक्षा शिवसेना पक्षातच आपली मोठी राजकीय ताकद राहील, असेही कदाचित आढळराव पाटील यांना वाटत असावे.दरम्यान आढळराव पाटील यांच्याप्रमाणेच आंबेगाव तालुक्यातील एका माजी आमदाराचा नातू देखील शिवसेनेत प्रवेश करण्याच्या मार्गावर असल्याच्या चर्चा तालुक्यात झडत आहेत.

पवार, वळसे पाटलांबरोबरच्या चर्चेनंतरच प्रवेश

शिवसेना प्रवेशाबाबत माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्याशी संपर्क साधला असता ते म्हणाले, मंचर नगर पंचायतीच्या निवडणुकीत नगराध्यक्ष पदाच्या उमेदवार मोनिका सुनील बाणखेले या माझ्या विचाराच्या उमेदवार होत्या. नगरपंचायत निवडणुकीत त्यांचा झालेला पराभव हा क्रॉस वोटींगमुळे झाला. पराभवानंतर माझ्या कार्यकर्त्यांशी बैठक झाली. त्या बैठकीत माझ्या कार्यकर्त्यांनी जाहीर नाराजी व्यक्त केली. माझ्या आगामी राजकीय राजकारणासंबंधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते अजित पवार आणि दिलीप वळसेपाटील यांच्या बरोबर बोलणार आहे.

## पिंपरी चिंचवड महानगरपालिका निवडणुकीत भाजपाचे रवी लांडगे बिनविरोध

**पिंपरी चिंचवड । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ व २६ च्या निवडणुकीचे भोसरी येथील भारतीय जनता पार्टीचे प्रभाग क्रमांक सहा चे उमेदवार रवी लांडगे यांची बिनविरोध निवड

पिंपरी चिंचवड शहरामध्ये ज्यांनी मुहूर्तमेढ भारतीय जनता पार्टीचे रोवली ते अंकुशराव लांडगे यांचा वारसा पुढे घेऊन जात असलेले जनसामान्यांशी नाळ असून नागरिकांच्या समस्या व नागरिकांच्या अडीअडचणी दूर करून प्रत्येकाला न्यायाची भूमिका म्हणून सकारात्मक कामे करून सर्वांना न्याय देण्याचं काम करणारे रवी भाऊ लांडगे यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५ च्या अनुषंगाने बिनविरोध निवड झाली असून कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण पाहायला मिळत आहे



तीन पिढ्यांचा संघर्ष आणि चार दशकांची अखंड सेवा म्हणजेच लांडगे घराणं - भोसरी व पिंपरी-चिंचवडच्या राजकारणाचा भक्कम कणा.

स्व. बाबासाहेब लांडगे यांनी नगरसेवक म्हणून प्रामाणिक राजकारणाची बीजं रोवली, तर लोकनेते स्व. अंकुशराव लांडगे यांनी त्या विचारांना संघटनात्मक ताकद देत भाजपाचा मजबूत डोलारा उभा केला. आशाताई व श्रद्धा लांडगे यांनी सामाजिक, महिला व नव्या पिढीच्या प्रश्नांना दिशा दिली.

या परंपरेला संघर्षाची धार देणारे नेतृत्व म्हणजे रवि बाबासाहेब लांडगे.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या इतिहासात सलग दोन वेळा बिनविरोध निवडून येणारे एकमेव नगरसेवक होण्याचा मान त्यांना मिळाला- ही जनतेच्या विश्वासाची पावती आहे. अडचणी, चुका, आत्मपरीक्षण आणि पुनरागमन या साऱ्या टप्प्यांत त्यांनी एकच गोष्ट जपली- विचारधारा आणि निष्ठा. आज ते पदासाठी नव्हे, तर कामासाठी उभे आहेत. रस्ते, पाणी, आरोग्य, युवकांचे भविष्य, पारदर्शक प्रशासन आणि शहराचा सर्वांगीण विकास हा त्यांचा अजेंडा आहे. भाजप हा त्यांच्यासाठी पक्ष नाही, संस्कार आहे- आणि त्या विचारधारेसाठी ते अखेरपर्यंत लढणार आहेत. इतिहास बोलतो आणि त्या इतिहासाचं नाव आहे - रवि बाबासाहेब लांडगे!

## निवडणूक आयोगाकडून अपक्षांसाठी १०१ चिन्हे राखीव

**पुणे । प्रतिनिधी**

महापालिका निवडणुकीसाठी ज्यांना तिकिट मिळाले नाही, अशांनी थेट बंडखोरी करीत अपक्ष म्हणून अर्ज भरला आहे. यंदाच्या निवडणुकीत अपक्षांची संख्या मोठी असण्याची शक्यता असून राज्य निवडणूक आयोगाने अपक्षासाठी १९१ इतकी चिन्हे राखीव ठेवली आहेत. यामध्ये विविध प्रकारच्या वस्तू, फळे, भाजीपाला आदींचा समावेश आहे.

अपक्ष उमेदवारांसमोर निवडणूक चिन्हे प्रत्येक मतदारांपर्यंत पोहोचवणे हे आव्हान असते. दैनंदिन वापराच्या वस्तू ही चिन्हे मतदारांना माहिती असतात.त्यामुळे अशाच चिन्हांना अपक्ष प्राधान्य देतात. टीव्ही, कपाट, रिक्षा, बॅट, लॅपटॉप, फुटबॉल, चावी ,हेडफोन, कंगवा, टेबल, फळा, दुर्बिण आदीं चिन्हांचा त्यात समावेश आहे. याचसह सफरचंद, बिस्कीट, पाव, केक, ढोबळी मिरची, फ्लॉवर, नारळ, ऊस, आले, द्राक्ष, हिरवी मिरची, फणस, भेंडी, मका, भुईमूग, वाटाणे, पेर, अननस, कलिंगड, अक्रोड, जेवणाची थाळी अशा चिन्हांचाही राखीव चिन्हांत समावेश आहे. अपक्ष उमेदवारांना तसेच मान्यता नसलेल्या राजकीय पक्षांच्या उमेदवारांना या मुक्त चिन्हांमधून चिन्हाची निवड करता येईल. चिन्ह वाटपाची प्रक्रिया ही आयोगाच्या नियम व मार्गदर्शक सूचनांनुसार पारदर्शक पद्धतीने करण्यात येते. मान्यताप्राप्त पक्षांना त्यांच्या राखीव चिन्हांवरच उमेदवार उभे करता येतात. राष्ट्रीय स्तरावरील पाच, राज्यस्तरीय पाच आणि इतर राज्यातील नऊ पक्षांची चिन्हे राखीव आहेत. त्यानंतर अपक्ष उमेदवारांसाठी १९१ मुक्त चिन्हे आहेत. त्यातून प्राधान्यक्रमाने चिन्हांची मागणी अर्जातच करावी लागते. उमेदवारांना ३ जानेवारी रोजी चिन्हांचे वाटप केले जाणार आहे.

## पुण्यात 'राजस्थान भवना'च्या उभारणीसाठी जागा द्यावी; राजस्थानी समाज संघाकडून मुख्यमंत्र्यांना पत्र

***कात्रज । प्रतिनिधी***

शहरात मोठ्या संख्येने वास्तव्यास असलेल्या राजस्थानी समाजासाठी स्वतंत्र 'राजस्थान भवन' उभारण्यासाठी ४ ते ५ एकर जागा उपलब्ध करून देण्यात यावी, अशी मागणी समस्त राजस्थानी समाज संघाकडून करण्यात आली आहे. यासंदर्भात संघाचे संस्थापक मगराज राठी यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना पत्र दिले आहे.



यासोबतच केंद्रिय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांच्याकडे पुणे ते जोधपूर रेल्वेच्या फेऱ्या वाढविण्याची मागणी केली असून तसे पत्रही देण्यात आले आहे.त्याचबरोबर, केंद्रिय उड्डाणमंत्री केआरएमजी नायडू केंद्रिय उड्डाण राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्याकडे पुणे ते उदयपूर थेट विमानसेवाही सुरु करण्याची मागणी पत्राद्वारे करण्यात आली आहे. राजस्थानी समाज संघाकडून देण्यात आलेल्या या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, राजस्थानची कला, संस्कृती व परंपरा देश-विदेशात प्रसिद्ध असून पुणे शहरात शिक्षण, वैद्यकीय उपचार व व्यवसायाच्या निमित्ताने मोठ्या प्रमाणावर राजस्थानी समाज वास्तव्यास आहे. पुण्यात सध्या अंदाजे १७ ते १८ लाख राजस्थानी समाजाची लोकसंख्या असूनही येथे अद्याप कोणतेही अधिकृत 'राजस्थान भवन' किंवा विश्रामगृह उपलब्ध नाही. राजस्थानी समाजातील विद्यार्थी तसेच उपचारासाठी पुण्यात येणाऱ्या आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांना निवासाच्या गंभीर अडचणींना सामोरे जावे लागत असून, त्यामुळे त्यांच्यावर मोठा आर्थिक भार पडत असल्याचेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या माध्यमातून पुण्यातील योग्य ठिकाणी ४ ते ५ एकर जागा उपलब्ध करून दिल्यास, राजस्थान भवनाचे बांधकाम जनसहयोगातून करण्यास संघ पूर्णतः तयार आहे. तसेच, रेल्वेच्या फेऱ्या वाढविल्यास आणि थेट विमानसेवा सुरु केल्यास दळणवळणासाठी फायदा होईल, असेही या निवेदनात नमूद करण्यात आलेले आहे. या निवेदनाच्या प्रती राजस्थानचे मुख्यमंत्री भजनलाल शर्मा, केंद्रीय सांस्कृतिक व पर्यटन मंत्री गजेंद्रसिंह शेखावत यांनाही देण्यात आल्या आहेत.

## पिंपरी चिंचवड महापालिका १२८ जागांसाठी ५ हजार ९८१ नामनिर्देशन पत्रांचे वितरण

### आज शेवटच्या दिवशी ३७० नामनिर्देशन पत्रांचे वितरण

**पिंपरी । प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता उमेदवारी अर्ज वितरण आज शेवटचा दिवस होता. त्या अनुषंगाने महानगरपालिकेच्या १२८ जागांसाठी ५ हजार ९८१ नामनिर्देशन पत्रांचे वितरण करण्यात आले. आज नामनिर्देशन वितरणाचा शेवटचा दिवस होता. शेवटच्या दिवशी दुपारी २ वाजेपर्यंत विहीत वेळेत निवडणूक निर्णय अधिकारी कार्यालयांमधून एकूण ३७० नामनिर्देशन पत्रांचे वितरण झाले आहे.

आज (३० डिसेंबर) सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत प्रभागनिहाय वितरित करण्यात आलेल्या नामनिर्देशन अर्जांची संख्या -

अ क्षेत्रीय कार्यालय -

प्रभाग क्र. १०, १४, १५, १९ साठी अनुक्रमे १५, ७, ७ व २७ असे एकूण ५६ नामनिर्देशन अर्जांचे वितरण करण्यात आले.

ब क्षेत्रीय कार्यालय -

प्रभाग क्र. १६, १७, १८, २२ साठी अनुक्रमे ११, १७, १८ व २२ असे एकूण ६८ नामनिर्देशन अर्जांचे वितरण करण्यात आले.

क क्षेत्रीय कार्यालय -

प्रभाग क्र. २, ६, ८, ९ साठी अनुक्रमे ३, ६, १४ व ६ असे एकूण २९ नामनिर्देशन अर्जांचे वितरण करण्यात आले.

ड क्षेत्रीय कार्यालय -

प्रभाग क्र. २५, २६, २८, २९ साठी अनुक्रमे ७, २, २ व ११ असे एकूण २२ नामनिर्देशन अर्जांचे वितरण करण्यात आले.

इ क्षेत्रीय कार्यालय -

प्रभाग क्र. ३, ४, ५, ७ साठी अनुक्रमे १६ ६,१ व ७ असे एकूण ३० नामनिर्देशन अर्जांचे वितरण करण्यात आले.

फ क्षेत्रीय कार्यालय -

प्रभाग क्र. १, ११, १२, १३ साठी अनुक्रमे १३, ६, ० व २२ असे एकूण ४१ नामनिर्देशन अर्जांचे वितरण करण्यात आले.

ग क्षेत्रीय कार्यालय -

प्रभाग क्र. २१, २३, २४, २७ साठी अनुक्रमे १६, १७, ८ व १० असे एकूण ५१ नामनिर्देशन अर्जांचे वितरण करण्यात आले.

ह क्षेत्रीय कार्यालय -

प्रभाग क्र. २०, ३०, ३१, ३२ साठी अनुक्रमे ८, २८, ३१ व ६ असे एकूण ७३ नामनिर्देशन अर्जांचे वितरण करण्यात आले.

## बॉर्डर अल्ट्रा मॅरेथॉनमध्ये संतोष वाघचौरे ठरले पहिले इंदापूरकर

**इंदापूर । प्रतिनिधी**

राजस्थानच्या रणरणत्या वाळवंटात,प्रखर ऊन,वेगवान वारे आणि प्रतिकूल हवामानाला समर्थपणे सामोरे जात बॉर्डर अल्ट्रा मॅरेथॉन या देशातील अत्यंत कठीण मानल्या जाणार्या स्पर्धेत इंदापूर तालुक्याचे सुपुत्र संतोष चंद्रहास वाघचौरे यांनी १०० किलोमीटरची शर्यत सलग धावत पूर्ण करून इतिहास घडवला आहे.



१२ तास २८ मिनिटांत त्यांनी ही अवघड शर्यत यशस्वीरीत्या पूर्ण करत इंदापूर तालुक्यातीलच नव्हे, तर संपूर्ण पुणे जिल्ह्यातील पहिले अल्ट्रा मॅरेथॉन धावपटू ठरण्याचा मान मिळवला. राजस्थानमधील जैसलमेर ते ऐतिहासिक लोंगेवाला बॉर्डर या मार्गावर ही स्पर्धा ७ डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२ वाजता सुरू झाली. ५०, १०० व १६० किलोमीटर अशा तीन गटांत ही मॅरेथॉन घेण्यात आली होती १०० किलोमीटरसाठी १६ तासांची, तर १६० किलोमीटरसाठी २८ तासांची मर्यादा निश्चित करण्यात आली होती. देशभरातून सुमारे १२०० धावपटूंनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला. इंदापूर तालुक्यातील ५४ वर्षीय संतोष वाघचौरे यांनी अथक इच्छाशक्ती, शिस्तबद्ध सराव आणि मानसिक कणखरतेच्या जोरावर १०० किलोमीटरचे अंतर १२ तास २४ मिनिटांत पूर्ण केले. वाळवंटी प्रदेशातील तापमान, सतत वाहणारे वारे आणि शारीरिक थकवा यावर मात करत त्यांनी ही कामगिरी साध्य केली.त्यामुळे इंदापूरच्या क्रीडा इतिहासात त्यांच्या नावाची सुवर्णाक्षरांनी नोंद झाली आहे. ९७१ च्या भारत-पाक युद्धात लोंगेवाला बॉर्डरवर शहीद झालेल्या जवानांच्या स्मरणार्थ सन २०१८ पासून या अल्ट्रा मॅरेथॉनचे आयोजन केले जाते. त्या ऐतिहासिक लढाईत पंजाब रेजिमेंटच्या २३ व्या बटालियनमधील अवघ्या १२० जवानांनी संपूर्ण रात्र हजारो पाकिस्तानी सैनिकांना रोखून धरत देशरक्षणाचा पराक्रम केला होता.

संतोष वाघचौरे यांच्या या दैदीप्यमान यशाबद्दल रण फॉर फन, इंद्रेश्वर मॅरेथॉन ग्रुप, राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे, इंदापूर नगर परिषदेचे नगराध्यक्ष भरत शहा, बाजार समितीचे संचालक मधुकर भरणे, माजी उपनगराध्यक्ष अरविंद वाघ, उद्योजक राजेंद्र जगताप यांच्यासह अनेक मान्यवरांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत. वाळवंटात घडलेला हा पराक्रम इंदापूरच्या युवकांसाठी प्रेरणादायी ठरत असून, वय नव्हे तर जिद्द महत्त्वाची हे संतोष वाघचौरे यांनी पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

## खोपोली पोलीस ठाण्यावर कॅन्डल मार्च; उर्वरित आरोपींना तात्काळ अटक करण्याची मागणी

**खोपोली । प्रतिनिधी**

मंगेश काळोखे यांच्या निर्घृण हत्येच्या निषेधार्थ आणि आरोपींना कठोरात कठोर शिक्षा, फाशीची शिक्षा देण्याच्या मागणीसाठी खोपोलीत सोमवारी (दि. २९) कॅन्डल मार्च काढण्यात आला. आमदार महेंद्र थोरवे यांच्या नेतृत्वाखाली साईबाबानगर येथून खोपोली पोलीस ठाण्यापर्यंत हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी मंगेश काळोखे यांच्या कुटुंबीयांसह हजारो नागरिक सहभागी झाले होते.

कॅन्डल मार्चदरम्यान संपूर्ण परिसरात तीव्र संतापाचे वातावरण होते. मंगेश काळोखे यांना न्याय मिळालाच पाहिजे, मारेकऱ्यांना फाशी द्या, अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. विशाल नेहूल पाटील यांना आंदोलकांच्या वतीने निवेदन देण्यात आले. आमदार महेंद्र थोरवे यांनी यावेळी बोलताना सांगितले की, हत्येप्रकरणात काही आरोपींना अटक झाली असली तरी अद्यापही कटामध्ये सहभागी असलेले काही आरोपी मोकाट आहेत. जोपर्यंत सर्व आरोपींना अटक होत नाही, तोपर्यंत लढा सुरूच राहील, असा ठाम इशाराही त्यांनी दिला.



मंगेश काळोखे यांच्या कुटुंबीयांकडून या हत्याकांडामागे राजकीय संबंध असल्याचा आरोप यावेळी करण्यात आला. राष्ट्रवादी काँग्रेसचे काही नेते व कार्यकर्ते या प्रकरणात सहभागी असल्याचा आरोप करत आमदार महेंद्र थोरवे यांनी काही नेत्यांची नावे घेतली. तसेच कर्जतमध्ये जाऊन संबंधित आरोपींना पाठबळ देण्याचा प्रयत्न करण्यात आल्याचाही आरोप त्यांनी केला. दरम्यान, कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलिसांचा मोठा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. कॅन्डल मार्च शांततेत पार पडला असला तरी, आरोपींना तात्काळ अटक न झाल्यास आंदोलन अधिक तीव्र केले जाईल, असा इशारा आंदोलकांनी दिला.

## शिरुर तालुक्यात जागा विक्रीला नकार दिल्याने शेतकऱ्यावर जीवघेणा हल्ला

**शिरूर । प्रतिनिधी**

आंबळे (ता. शिरुर) येथे जागा विक्रीस नकार दिल्याचा राग मनात धरुन एका ६० वर्षीय शेतकऱ्याला लोखंडी रॉडने अमानुष मारहाण केल्याची धक्कादायक घटना शिरुर तालुक्यातील आंबळे गावात घडली आहे. या प्रकरणी संजय बाळासाहेब बेंद्रे याच्याविरुद्ध शिरुर पोलिस ठाण्यात गंभीर स्वरुपाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

विलास नारायण बेंद्रे (वय ६०, व्यवसाय शेती, रा. आंबळे) यांनी याबाबत फिर्याद दिली असून दि ३० डिसेंबर २०२५ रोजी दुपारी १२.२१ वाजण्याच्या सुमारास महेश विष्णु करे यांच्या बांधकाम सुरु असलेल्या स्लॅबवर हा प्रकार घडला. आरोपी संजय बेंद्रे याने बांधकामासाठी जागा कमी पडत असल्याचे सांगत फिर्यादीकडे त्यांच्या शेजारच्या ४ फूट रुंद व ६० फूट लांबीच्या जागेची मागणी केली. मात्र, फिर्यादीने स्पष्ट नकार देत विषय सोडून देण्यास सांगितले.

त्याच क्षणी आरोपीचा संताप अनावर झाला. फिर्यादी जिना उतरुन खाली जात असतानाच आरोपीने तेथेच पडलेला लोखंडी गज उचलून फिर्यादीच्या पाठीवर, डोक्यावर व डाव्या पायावर बेदम मारहाण केली. या मारहाणीमुळे विलास बेंद्रे खाली कोसळले. एवढ्यावर न थांबता आरोपीने त्यांना पायाला धरून ओढत स्लॅबवरुन खाली फेकण्याचा प्रयत्न केला. तसेच आज तुला संपवतो, स्लॅबखाली टाकून देतो, अशी जिवे मारण्याची धमकी देत आरोपीने पुन्हा लोखंडी गजाने हल्ला केल्याचे फिर्यादीत म्हटले आहे.

## आरोपीला फाशी द्या; उर्से बालिका प्रकरणी मावळवासी संतप्त

**वडगाव मावळ । प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील उर्से गावात घडलेल्या बालिकेवरील अमानुष अत्याचार व खुनाच्या घटनेविरोधात संपूर्ण तालुक्यात तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. उर्से बालिकेच्या अत्याचार-खुनातील आरोपीला फाशी द्या या ठाम मागणीसाठी मावळ बंद पुकारण्यात आला, या बंदला नागरिकांनी मोठ्या प्रमाणात प्रतिसाद दिला. वडगाव फाट्यावरही आंदोलन झाले.



सकाळपासूनच उर्से, तळेगाव दाभाडे, कडधे, सोमाटणे, कामशेत आदी भागांमध्ये दुकाने, बाजारपेठा व खासगी आस्थापने बंद ठेवण्यात आल्या होत्या. अनेक ठिकाणी ग्रामस्थ, सामाजिक संघटना आणि विविध संघटनांचे कार्यकर्ते रस्त्यावर उतरले होते. आरोपीला कठोरात कठोर शिक्षा द्या अशी जोरदार मागणी यावेळी करण्यात आली. बंद दरम्यान ठिकठिकाणी घोषणाबाजी करत निषेध मोर्चे काढण्यात आले. बालिकांना न्याय मिळालाच पाहिजे, गुन्हेगारांना पाठीशी घालू नका अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. नागरिकांचे म्हणणे होते की अशा क्रूर घटनांमुळे समाजात भीतीचे वातावरण निर्माण होत असून याला आळा घालण्यासाठी कडक शिक्षा आवश्यक आहे. या आंदोलनाच्या वेळी माजी राज्यमंत्री बाळा भेगडे उपस्थित राहिले. त्यांनी आंदोलकांशी संवाद साधून त्यांच्या मागण्या शांतपणे ऐकल्या. अशा घटना पुन्हा घडू नयेत यासाठी शासन आणि प्रशासनाने ठोस पावले उचलावीत, अशी भूमिका आंदोलकांनी यावेळी व्यक्त केली. कायदा-सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी पोलिसांचा चोख बंदोबस्त ठेवण्यात आला होता. बंद शांततेत पार पडला असून, प्रशासन आणि न्यायालयाने या प्रकरणात तातडीने निर्णय घ्यावा, अशी अपेक्षा मावळकरांनी व्यक्त केली.